MAHMARI 19358/13/1/2000 - TC

प्रज्वालितो ज्ञानमयः प्रदीपः
विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा ठाणे • १९३५

# व्ही.पी.एम्. दिशा

वर्ष बाविसावे / अंक ९ / सप्टेंबर २०२१

## संपादकीय

### महाकाय रेडिओ दुर्बीणीचे निर्माते

खगोलीय वस्तूंचे मानवाला प्रचंड कुतूहल आहे. उघड्या डोळ्यांनी निरीक्षणे करून भारतीय शास्त्रज्ञांनी आकाशातील ग्रह ताऱ्यांची उपयुक्त अशी माहिती मिळविली. दुर्बीणीच्या शोधाने या कामाला गती मिळाली. परंतु काही काळातच प्रकाशीय दुर्बीणीच्या (Optical Telescope) मर्यादा संशोधकांच्या लक्षात आल्या. खगोलीय वस्तूमधून विविध तरंगलांबीच्या विद्युत चुंबकीय लहरी बाहेर पडतात. यातील केवळ मर्यादित लहरीच प्रकाशीय दुर्बीणीतून दिसतात. त्यापेक्षा कमी, तसेच जास्त तरंगलांबीच्या लहरींसाठी वेगळी दुर्बीण असण्याची गरज खगोलशास्त्रज्ञांना भासू लागली. विशेषत: प्रकाश किरणांपेक्षा जास्त लांबीचे रेडिओ किरण जर आपल्याला पकडता आले तर अनेक खगोलीय घटनांचा अर्थ लावता येईल, असे या क्षेत्रातील शास्त्रज्ञांना वाटू लागले. यातून जन्म झाला तो रेडिओ खगोलशास्त्र (Radio Astronomy) या उपविषयाचा. या क्षेत्रात जगातील अनेक संशोधन संस्थांनी पुढाकार घेतला. रेडिओ तरंग पकडू शकतील अशा दुर्बीणी ते विकसित करू लागले. यात अग्रक्रमावर आहे मुंबई स्थित टाटा इन्स्टिट्यूट ऑफ फंडामेंटल रिसर्च (टीआयएफआर).

टीआयएफआर ही मूलभूत विज्ञानात संशोधन करणारी भारतातील अग्रगण्य अशी संशोधन संस्था आहे. या संस्थेत अनेक विषयांवर संशोधन केले जाते. त्यातील एक आहे खगोलशास्त्र. १९६० च्या दशकात या संस्थेत रेडिओ खगोलशास्त्र या विभागाची सुरुवात करण्यात आली. या विभागातील शास्त्रज्ञांनी खगोलीय वस्तुकडून येणाऱ्या रेडिओ तरंगांचा अभ्यास करण्यासाठी तामिळनाडू राज्यातील उटी या गावाजवळ डोंगरावर एक रेडिओ दुर्बीण उभारली. या दुर्बीणीने रेडिओ खगोलशास्त्राच्या संशोधनाला चालना दिली. हे क्षेत्र विस्तारले जात होते. त्यात टिकून राहण्यासाठी अधिक क्षमतेची रेडिओ दुर्बीण उभारणे आवश्यक होते. यासाठी टीआयएफआर मध्ये १९८० च्या दशकात नॅशनल सेंटर फॉर रेडिओ ॲस्ट्रोफिझिक्स (National Centre for Radio Astrophysics) या राष्ट्रीय केंद्राची स्थापना करण्यात आली. या केंद्राच्या वतीने १९९० च्या दशकात पुणे नाशिक रस्त्यावर असलेल्या नारायणगाव जवळ खोडद या खेड्यात महाकाय मीटर तरंग रेडिओ दुर्बीणीची (Giant Meterwave Radio Telescope) निर्मिती

(पृष्ठ क्र. २ वर)

(मुखपृष्ठावरून - **संपादकीय**)

करण्यात आली. या दुर्बीणीवर देखरेख ठेवण्यासाठी आणि तिथे मिळालेल्या माहितीचे विश्लेषण करायला सोयीचे व्हावे यासाठी एनसीआरए हे राष्ट्रीय केंद्र पुणे येथे बांधण्यात आले. पुणे विद्यापीठाने त्यासाठी जागा उपलब्ध करून दिली.

जीएमआरटी ही दुर्बीण अनेक दृष्टीने वैशिष्ट्यपूर्ण आहे. या दुर्बीणीच्या निर्मितीत एक वेगळीच शक्कल लढवण्यात आली आहे. ३० अँटेना एकत्र करून ही दुर्बीण बनविण्यात आली आहे. प्रत्येक अँटेनाचा व्यास ४५ मीटर असून त्यांची रचना इंग्रजी वाय अक्षराच्या आकारात करण्यात आली आहे. पृथ्वी जेव्हा आपल्याभोवती फिरते तेव्हा हा समूह महाकाय दुर्बीणीचे काम करतो. अशा प्रकारची ही जगातील एकमेव दुर्बीण आहे. खगोलीय संशोधनात या दुर्बीणीने मोलाची कामगिरी केली आहे. विशेष हे की, ही दुर्बीण पूर्णपणे स्वदेशी बनावटीची आहे. दूरवरच्या रेडिओ-लहरी पकडण्याची तिची क्षमता असल्याने जगातील अनेक खगोलशास्त्रज्ञ तिचा उपयोग करतात. त्यातून आपल्या देशाला परकीय चलन मिळते. या महाकाय दुर्बीणीच्या निर्मितीत सिंहांचा वाटा आहे तो डॉ. गोविंद स्वरूप यांचा. मागच्या वर्षी (२०२०) ७ सप्टेंबर रोजी त्यांनी पुण्यात शेवटचा श्वास घेतला. त्यांचे स्मरण करण्यासाठी हे संपादकीय लिहिले आहे.

डॉ. गोविंद स्वरूप हे दीर्घ काळ टाटा इन्स्टिट्यूट ऑफ फंडामेंटल रिसर्च (टीआयएफआर) या संस्थेत काम करीत होते. या संस्थेची स्थापना ज्येष्ठ भौतिकशास्त्रज्ञ डॉ. होमी भाभा यांनी १९४५ मध्ये केली. भारतीय संशोधकांना हेरून होमी भाभा त्यांना टीआयएफआर मध्ये काम करण्यासाठी पाचारण करीत असत. गोविंद स्वरूप हे त्यातलेच एक होते. १९६३ साली ते टीआयएफआर मध्ये रुजू झाले. १९९० दशकाच्या उत्तरार्धात ते रीतसर निवृत्त देखील झाले. परंतु त्यानंतरही ते या संस्थेसाठी काम करीत राहिले. मोकळ्या मनाचा आणि हसतमुख चेहऱ्याचा संशोधक अशी त्यांची प्रतिमा माझ्या मनात आहे. या माणसाशी गप्पा मारणे म्हणजे एक पर्वणीच होती. त्यांच्याकडे सांगण्यासारखे खूप असल्याने ते दुसऱ्याला बोलण्याची संधी क्वचितच देत असत. हिंदी भाषेतील त्यांचे बोलणे ऐकत राहावे असेच होते. वयाची साठी आली असतानादेखील जीपने त्यांनी दुर्बीणीसाठी योग्य जागा शोधायला हजारो किलोमीटरचा प्रवास केला.

२३ मार्च १९२९ रोजी ठाकूरद्वार, उत्तर प्रदेश येथे गोविंद स्वरूप यांचा जन्म झाला. अलाहाबाद येथून १९४८ मध्ये त्यांनी बी.एससी.ची पदवी मिळवली. त्यानंतर १९५० मध्ये विज्ञानाची मास्टर्स (MSc) पदवी संपादन करून त्यांनी १९५२ मध्ये ऑस्ट्रेलियामधील सी.एस.आय.आर.ओ. येथे खगोलशास्त्र विषयक कार्य सुरू केले. डॉ. गोविंद स्वरूप यांनी नवी दिल्ली येथील राष्ट्रीय भौतिकशास्त्र प्रयोगशाळेत १९५०-५३ आणि १९५५-५६ या काळात काम केले. त्यांनी १९५६-५७ मध्ये हार्वर्ड विद्यापीठात संशोधन सहाय्यक म्हणून काम केले तर १९५७-६० या काळात स्टॅनफोर्ड विद्यापीठात संशोधन सहाय्यक म्हणून काम केले. १९६१ मध्ये त्यांनी स्टॅनफोर्ड विद्यापीठाची पीएचडी ही मानाची पदवी संपादन केली. त्यानंतर त्यांनी १९६१-६३ या काळात स्टॅनफोर्ड विद्यापीठात सहाय्यक प्राध्यापक म्हणून काम केले. डॉ. होमी भाभा यांच्या सूचनेवरून ते १९६३ मध्ये भारतात परत आले.

(पृष्ठ क्र. ३ वर)

व्ही.पी.एम्.

# दिशा

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा ठाणे • १९३५

वर्ष बाविसावे/अंक ९/सप्टेंबर २०२१

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष २६ वे/अंक ३ रा)

**कार्यालय/पत्रव्यवहार**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
**www.vpmthane.org**

**मुद्रणस्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१**
**२५४१ ३५४६**
**Email:perfectprints@gmail.com**

## अनुक्रमणिका

| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | डॉ. सुधाकर आगरकर | |
| २) | स्वायत्तते नंतरची नवीन सुरुवात | डॉ. सुचित्रा नाईक | २ |
| ३) | एक आगळंवेगळं तीर्थक्षेत्र | शैलजा बेडेकर | ५ |
| ४) | त्रिगुणात्मक त्रयमूर्ती दत्त हा जाणा... | सहा. प्रा. सुभाष गं. शिंदे | ६ |
| ५) | भाभा अणुकेंद्राची प्रशाला | नरेंद्र गोळे | १४ |
| ६) | 'मास्तरकी'ची मास्टर-की | प्रशांत सुसर | १७ |
| ७) | मराठवाडा मुक्ती संग्राम दिन | सौ. सविता ज. धर्माधिकारी | २० |
| ८) | परिसर वार्ता | संकलित | २३ |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून, त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# स्वायत्तते नंतरची नवीन सुरुवात

*विद्या प्रसारक मंडळाच्या के. ग. जोशी तथा वा. ना. बेडेकर कला व वाणिज्य महाविद्यालयाला नुकताच विद्यापीठ अनुदान आयोगाकडून 'स्वायत्तता व दर्जा' प्राप्त झाला. हा महत्त्वाचा पल्ला पार केल्यानंतर केंद्र शासनाच्या महत्त्वाच्या संस्थांच्या सहकार्याने आयोजित केलेल्या उपक्रमाच्या माध्यमातून उच्च शिक्षण क्षेत्रात भरीव योगदान देण्याचा महाविद्यालयाचा प्रयत्न आहे. प्रस्तुत लेखात या विषयावर प्रकाश टाकला आहे – संपादक*

भारतीय मूल्यांची प्रतिष्ठापना करण्यासाठी व शिक्षण क्षेत्रात आमूलाग्र बदल घडविण्यासाठी नवे शैक्षणिक धोरण अस्तित्वात आले. ६६ पानांच्या नवीन शैक्षणिक धोरणाच्या मसुद्यामध्ये २०० पेक्षा जास्त वेळेला 'शिक्षक' हा शब्द आला असून शिक्षकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. प्रगतीशील शिक्षक व नुकतेच आंतरराष्ट्रीय स्तरावर गौरवल्या गेलेल्या रणजीत डिसले गुरुजी यांचे उदाहरण या संदर्भात महत्त्वाचे आहे. विद्यार्थ्यांचे मूल्यमापन करण्यासाठी मूलगामी बदल नवीन शैक्षणिक धोरण सुचवते. नवे शैक्षणिक धोरण हे निर्धारित अभ्यासक्रमांची पुनर्मांडणी करून विद्यार्थी त्यातून नक्की काय शिकला हे अधोरेखित करणारे आहे.

नवीन शैक्षणिक धोरणामध्ये स्वायत्त महाविद्यालयांचे महत्त्वाचे स्थान आहे. भारतात असलेल्या ४० हजार पेक्षा अधिक महाविद्यालयांतून केवळ ९०० महाविद्यालयांना स्वायत्तता दर्जा मिळाला आहे. त्या मानाने ही संख्या फारच छोटी आहे. जोशी-बेडेकर महाविद्यालयाला नुकताच स्वायत्त दर्जा हा विद्यापीठ अनुदान आयोगाकडून मिळाला. स्वायत्त महाविद्यालयांनी सृजनात्मक कार्यपद्धती अवलंबून नवीन शैक्षणिक धोरण अंमलात आणण्यासाठी आदर्श कार्य करावे लागणार आहे. या परिप्रेक्षात केंद्र शासनाच्या काही नामांकित संस्थांच्या सहकार्याने महाविद्यालयाने काही महत्त्वाचे उपक्रम हाती घेतले आहेत. त्याचा धावता आढावा पुढील प्रमाणे :

## राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान आयोजित कार्यशाळा

नवीन शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीसाठी स्वायत्त महाविद्यालयांनी करावयाच्या उपाययोजनांवर विचार मंथन करण्यासाठी राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान आणि विद्या प्रसारक मंडळाच्या जोशी-बेडेकर स्वायत्त महाविद्यालय व रामानंद आर्य स्वायत्त महाविद्यालय, भांडुप यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १ ते ७ जुलै २०२१ दरम्यान सात दिवसांची विशेष कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेच्या उद्घाटन सत्रात राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान अर्थात रुसाचे मुख्य सल्लागार डॉ. विजय जोशी व डॉ. पाब्रेकर उपस्थित होते. तर समारोप सत्रात मुंबई विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. रवींद्र कुलकर्णी उपस्थित होते. यावेळी रामानंद आर्य डीएव्ही स्वायत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अजय भामरे उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या समारोप सत्रामध्ये बोलत असताना मुंबई विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. रवींद्र कुलकर्णी म्हणाले की, 'नवीन शैक्षणिक धोरणाने शिक्षण क्षेत्राच्या अपेक्षा उंचावलेल्या असून येऊ घातलेल्या चौथ्या औद्योगिक क्रांतीसाठी शिक्षण क्षेत्राने हातभार लावला पाहिजे. नवीन तंत्रज्ञानातील मूलगामी संशोधनामुळे सध्या शिकत असलेल्या गोष्टी लवकरच कालबाह्य होतील अशी परिस्थिती असताना विद्यार्थ्यांना कल्पक व शाश्वत विकासाकडे नेणारे शिक्षण दिले पाहिजे. प्रख्यात वैज्ञानिक

अल्बर्ट आइन्स्टाईन यांच्या विचारांना उजाळा देत डॉ. कुलकर्णी म्हणाले की, शाळेत मिळालेले ज्ञान पुढे आपल्या संशोधनाने संवर्धित करून पुढच्या पिढीपर्यंत शिक्षकांनी पोहोचवले पाहिजे.

रुसाचे मुख्य सल्लागार डॉ. विजय जोशी यांनी या सात दिवसीय कार्यशाळेतील सर्व कल्पक गोष्टींचा वापर करून नवे शैक्षणिक धोरण स्वायत्त महाविद्यालयांनी अंमलात आणावे व होणाऱ्या नवीन बदलांचे साक्षीदार व्हावे असे आवाहन केले.

सात दिवसीय कार्यशाळेत अनेक मान्यवरांनी विविध विषयांवर आपले मत मांडले. यामध्ये सायंटिफिक रिसर्च सेंटर वझे-केळकर महाविद्यालयाचे डॉ. बर्वे, सोमय्या विद्यापीठाचे श्री. गौरांग शेट्टी, डॉ. राधा अय्यर, सेंट झेवियर्स महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ. फ्रेझर, ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ डॉ. विवियन अमोनकर, नाशिकचा के. टी. एच. एम. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गायकवाड, टिसच्या मैथिली रामचंद, मुंबई विद्यापीठाच्या डॉ. सीबील थॉमस, शिक्षण सहसंचालक डॉ. संजय जगताप इत्यादी मान्यवरांचा समावेश होता. कार्यक्रमाच्या संयोजनात अंतर्गत गुणवत्ता संवर्धन कक्षाच्या समन्वयक डॉ. प्रज्ञा राजेबहादुर व रामानंद आर्य महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. पद्माकर माने यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

या कार्यशाळेसाठी २३६ प्राध्यापकांनी सहभाग नोंदवला होता. या वेळी काही प्राध्यापकांनी प्रातिनिधिक स्वरूपात कार्यशाळेतील आपले अनुभव व्यक्त केले.

### 'स्वयम्' पोर्टलच्या ठाणे शाखेचे उद्‌घाटन

भारत सरकारच्या शिक्षा मंत्रालयाच्या वतीने ऑनलाईन शिक्षण सर्वदूर पोहोचवण्यासाठी 'स्वयम्' नावाचे पोर्टल कार्यरत असून त्याच्या ठाणे शाखेचे उद्‌घाटन विद्या प्रसारक मंडळाच्या जोशी-बेडेकर स्वायत्त महाविद्यालयात १७ जुलै २०२१ रोजी संपन्न झाले. या कार्यक्रमासाठी विद्या प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर उपस्थित होते. उद्‌घाटन प्रसंगी डॉ. विजय बेडेकर म्हणाले की, 'अध्ययन अध्यापनाच्या शतकांच्या इतिहासामध्ये भारताने मोठे योगदान दिले आहे. चार भिंतींच्या पलीकडे जाऊन व साचेबंद अभ्यासक्रमाच्या व्यतिरिक्त कौशल्य-विकास व सर्वांगीण व्यक्तिमत्त्वाचा विकास आवश्यक असून तो स्वयम्च्या माध्यमातून होईल' असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. केंद्र सरकारच्या या ऑनलाईन पोर्टलचे त्यांनी स्वागत केले व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना त्याचा निश्चित लाभ होईल असे मत व्यक्त केले.

याप्रसंगी स्वयम्चे समन्वयक डॉ. सागर ठक्कर यांनी स्वयम् पोर्टलच्या माध्यमातून उपलब्ध करण्यात आलेल्या दहा कोर्सेसची माहिती विद्यार्थी व प्राध्यापकांना करून दिली. महाविद्यालयातील अनेक प्राध्यापक व विद्यार्थी या नवीन अभ्यासक्रमातून लाभान्वित होणार आहेत.

राज्यशास्त्र, मानसशास्त्र, वाणिज्य, व्यक्तिमत्त्व विकास इत्यादी दहा वेगवेगळ्या विषयांवर अभ्यासक्रम उपलब्ध करण्यात आले असून त्यासाठी २०० विद्यार्थ्यांनी आपले नाव नोंदवले आहे. हे अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना आपल्या नियमित कोर्सेस पेक्षा वेगळ्या विषयांचं ज्ञान मिळविण्यासाठी उपयुक्त ठरतील.

### लोकसेवेची मूलतत्त्वे विषयावरील विशेष अभ्यासक्रमाचे आयोजन

महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना व डी एल एल ई (DLLE) विभागाने महात्मा गांधी नॅशनल कौन्सिल ऑफ रुरल एज्युकेशन (MGNCRE), मुंबई विद्यापीठाचा DLLE विभाग, तसेच महिला परिवर्तन संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थ्यांसाठी तीन आठवड्याच्या लोकसेवेचे मूलतत्त्वे या विषयावरील एका विशेष अभ्यासक्रमाचे आयोजन १५ जून ते ४ जुलै २०२१ च्या कालावधीत करण्यात आले होते. मुंबई विद्यापीठाचा DLLE विभागाचे संचालक डॉ दिलीप पाटील, महिला परिवर्तन संस्थेच्या श्रीमती वर्षा परचुरे, एम जी एन सी

आर ई चे श्री. चेतन चीतलकर, मुंबई विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना प्रकल्प अधिकारी श्री. सुधीर पुराणिक, जोशी-बेडेकर महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना प्रकल्प अधिकारी प्रा-शिवाजी नाईक व जोशी-बेडेकर महाविद्यालयाच्या डी एल एल इ विभागाच्या प्रमुख डॉ. संगीता मोहंती व उपप्राचार्या डॉ. प्रियंवदा टोकेकर उपस्थित होत्या.

**एकवीस दिवसीय ओरिएंटेशन कोर्सचे आयोजन**

विद्यापीठ अनुदान आयोग संचलित मानव संसाधन विकास केंद्र मुंबई विद्यापीठ व राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान यांच्या वतीने एकवीस दिवसीय ओरिएंटेशन कोर्सचे आयोजन दिनांक १९ जुलै ते ७ ऑगस्ट २०१९ दरम्यान करण्यात आले होते. याचे संपूर्ण संयोजन जोशी-बेडेकर स्वायत्त महाविद्यालयाच्या वतीने करण्यात आले. या कोर्सच्या उद्‌घाटनाला मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुहास पेडणेकर उपस्थित होते. समारोप सत्रासाठी एस एन डी टी विद्यापीठाच्या माजी कुलगुरू डॉ. शशिकला वंजारी यांचे मार्गदर्शन मिळाले.

या कोर्ससाठी ३२ प्राध्यापक भारताच्या विविध राज्यांमधून सहभागी झाले होते. या कोर्समध्ये मॅगसेसे पुरस्कार प्राप्त डॉ. भरत वाटवानी, मेधा पाटकर व नीलिमा मिश्रा यांच्यासह ७० वक्ते मार्गदर्शक म्हणून लाभले होते. या कोर्सच्या संयोजनाची जबाबदारी डॉ. नीलम शेख व प्रा. वेदवती परांजपे यांनी सांभाळली.

**B.Voc (सेल्स मार्केटिंग अँड मॅनेजमेंट) हा कोर्स**

विद्यापीठ अनुदान आयोग मान्यताप्राप्त असा B.Voc तेल (सेल्स मार्केटिंग अँड मॅनेजमेंट) हा कोर्स महाविद्यालयाने २०२०-२१ शैक्षणिक वर्षापासून सुरू केला असून, आता त्याचे द्वितीय वर्ष सुरू झाले आहे. आपत्ती व्यवस्थापन अर्थात डिझास्टर मॅनेजमेंट या नवीन व महत्त्वाच्या विषयावर देखील विद्यापीठ अनुदान आयोग मान्यताप्राप्त कोर्स महाविद्यालयाने सुरू केला आहे.

**सेतू वर्ग (Bridge Course) तसेच मूल्यवर्धित अभ्यासक्रम (Value- Added Course)**

अभ्यासक्रमाबरोबरच विद्यार्थ्यांठायी काही कौशल्य प्राप्त व्हावे या हेतूने महाविद्यालय गेले काही वर्ष 'सेतू वर्ग' (Bridge Course) तसेच मूल्यवर्धित अभ्यासक्रम (Value-Added Course) राबवत आहे. चित्रपट रसास्वाद, फोटोग्राफी, क्रिएटिव्ह रायटिंग, शेअर मार्केट, तत्त्वज्ञान, मानसशास्त्र, राज्यशास्त्र, इतिहास अशा अनेक विषयांवर हे कोर्सेस असतात. या वर्षी महाविद्यालयाने असे १० मूल्यवर्धित अभ्यासक्रम व १३ सेतू वर्ग घेतले. याचा फायदा एकूण १२१३ विद्यार्थ्यांना झाला.

''सा विद्या या विमुक्तये'' असे आपल्या परंपरेत म्हटले आहे. व्यक्तीला एका साचेबंद विचारकक्षेतून मुक्त करणारी शिक्षण व्यवस्था निर्माण करणे हे शिक्षण संस्थांचे ध्येय हवे. विद्यार्थ्यांना रोजगाराभिमुख शिक्षण देऊन आपल्या पायावर उभे करणारे शिक्षण देखील द्यावयास हवे. आपल्या परिसरात, जिल्ह्यात, उपलब्ध असलेल्या उद्योगधंद्यांसाठी देखील विद्यार्थ्यांना तयार करावे लागेल. यासोबतच कला, साहित्य, संस्कृती याचेही जतन करणे महत्त्वाचे आहे. या एकूणच आव्हानांना सामोरे जाण्यासाठी आपल्या स्वायत्त महाविद्यालयाचे कार्य अधोरेखित होईल व या माध्यमातून समाजाची सेवा करता येईल असा विश्वास वाटतो.

या एकूण कामांमध्ये महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. सुभाष शिंदे, डॉ. प्रियंवदा टोकेकर व डॉ. महेश पाटील यांचे सहकार्य असते. तसेच सर्व विभाग प्रमुख, समन्वयक, प्राध्यापक यांचे सहकार्य देखील मिळते. विद्या प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर यांचे प्रोत्साहन व मार्गदर्शन या शैक्षणिक उत्थानाच्या वाटेवर आश्वासक आहे.

**- डॉ. सुचित्रा नाईक**
प्राचार्या
जोशी बेडेकर स्वायत्त महाविद्यालय, ठाणे

# एक आगळंवेगळं तीर्थक्षेत्र

*थोर क्रांतीकारक व स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांचा जीवनपट या लेखात उलगडून दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. – संपादक*

एक आगळंवेगळं तीर्थक्षेत्र पाहिलं. तिथे नव्हता पंढरीचा पांडुरंग, नव्हता अयोध्येचा राम, नव्हता काशीचा विश्वेश्वर की नव्हता द्वारकेचा श्रीकृष्ण. तिथे नव्हती पवित्र गंगा, चंद्रभागा की शरयू. तर होते जिवाचा थरकाप उडविणारे काळे पाणी. खरे म्हणजे तो समुद्र काळा मुळीच नाही, तर अप्रतिम सुंदर आहे. पण तिथे आणलेल्या देशभक्त क्रांतिकारकांवर मानवतेला काळिमा आणणारे क्रूर छळ, अत्याचार केले जायचे म्हणून त्याला नाव पडले 'काळे पाणी'.

येथे हात-पाय बेड्यांमध्ये जखडलेल्या, चालत्या बोलत्या विभूतींना, मातृभूमीकरता आपल्या आयुष्याचा यज्ञ पेटवून त्यात आपल्या देहाच्या समिधा अर्पण केल्या होत्या. 'अंदमान' म्हणजे देशभक्तांची, क्रांतिकारकांची यज्ञभूमीच होती. या यज्ञाकरता तुपाची धार होती ती कोलू पिसून गाळलेल्या घामाची नी सांडलेल्या रक्ताची. या यज्ञाला बळी दिले जात होते मातृभूमीच्या स्वातंत्र्याकरता घरादाराची होळी केलेल्या क्रांतीवीरांचे आणि या यज्ञाकरता मंत्र म्हटले जात होते स्वातंत्र्यदेवीच्या स्तुतीसुमनांचे. त्या मंत्रांचे जयघोष सेल्युलर जेल मधल्या मातीच्या कणाकणांतून निनादत होते आणि अजूनही निनादत आहेत. त्या यज्ञाचे पौरोहित्य करत होते स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर.

स्वातंत्र्यवीर सावरकर म्हणजे मूर्तीमंत तेजच. चाफेकर बंधूंच्या हौतात्म्याच्या स्फुल्लिंगानेच बालवयांत देश स्वातंत्र्याच्या विचाराने त्यांचे अवघे जीवनच व्यापून गेले. मातृभूमी, अवघा भारत देश हाच त्यांचा देव होता, हाच त्यांचा धर्म होता, हेच त्यांचे कर्म होते, अवघे जीवन होते. मातृभूमीच्या आत्यंतिक प्रेमाचे, भक्तीचे बाळकडू त्यांना मिळाले होते. त्यांनी मातृभूमीच्या स्वातंत्र्यप्राप्तीचेच व्रत घेतले होते आणि बाकीच्यांना घ्यायला लावले होते. त्यांना ध्यानी, मनी, स्वप्नी, जळी, स्थळी, काष्ठी, पाषाणी देश स्वातंत्र्यच दिसत होते.

स्वभाव, स्वधर्म, स्वकर्म हे सारे सारे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे पैलू स्वदेश स्वातंत्र्याच्या विचारानेच चमकत होते. त्यांच्या श्वासाश्वासातून, रक्ताच्या थेंबाथेंबातून मातृभूमीचेच विचार स्फुरण पावत होते. हनुमंताच्या ह्रदयात केवळ 'राम' होता; तसेच त्यांच्या आचार, विचार, उच्चारातून मातृभूमीचे स्वातंत्र्य दिसत होते. ऐकू येत होती अत्यंत उत्कृट, भव्य, उदात्त भक्ती, प्रेम भावना आणि त्यातूनच त्यांच्या ठिकाणी भव्य-दिव्य, साहस, धाडस, शौर्य, निर्भयता, तितिक्षा हे गुण प्रकर्षाने जन्मतःच होते.

आणि म्हणूनच केवळ त्यांनी स्वातंत्र्य लढ्यांत शौर्य गाजवण्याकरता आपल्या शरीराची मोळी करून उडी घेतांना सोलवटून घेऊन सागराच्या खाऱ्या पाण्याचे मीठ चोळून घेऊन, दिव्यदाहक अग्निदिव्य केले. पण हे अग्निदिव्य इथेच संपले नाही; तर अंदमानात रोजच्या रोज कोलू पिसतांना आणि बारी-बाबाच्या छळाला पुरून उरतांना ते रोजच्या रोज 'घडत' होते आणि तरीही आपल्या अंगिकारलेल्या कार्यापासून, ध्येयापासून, अगदी

(पृष्ठ क्र.१३ वर)

# त्रिगुणात्मक त्रयमूर्ती दत्त हा जाणा...

*ब्रह्मा, विष्णू व भगवान शिवाचे रूप मानल्या गेलेल्या दत्तात्रेय या देवतेविषयी माहिती देणारा लेख– संपादक*

दत्तात्रेय ही महाराष्ट्रातील एक लोकप्रिय देवता होय. महाराष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण भारतात दत्तात्रेयाची उपासना व पूजा केली जाते. भगवान दत्तात्रेयाशी संबंधित पवित्रस्थळे भारताच्या विविध भागांमध्ये विखुरलेली आहेत. श्री दत्तात्रेय हा ब्रह्मा, विष्णू आणि शिव अशा तीन देवांचा संयुक्त अवतार मानला जातो. ब्रह्मा हा सृष्टीचा रचेता, विष्णू सृष्टी व विश्वाचा पालनहार आणि शिव प्रलय आणून सृष्टी व विश्वाचा नाश करणारा अशी श्रद्धा वा धारणा हिंदूंमध्ये साधारणपणे आढळते. श्री दत्तात्रेयाशी निगडित असलेले महाराष्ट्रातील एक प्रसिद्ध तीर्थक्षेत्र म्हणजे नांदेड जिल्ह्यातील माहूर हे ठिकाण होय. पूर्वी माहूर नांदेड जिल्ह्यातील किनवट या तालुक्यात येत असे. परंतु सध्या माहूर हा नांदेड जिल्ह्यातील एक तालुका आहे. औदुंबर, कुरवपूर, नरसोबाची वाडी, गाणगापूर, गिरनार पर्वत व पिठापूर ही दत्तात्रेयाशी निगडित इतर काही महत्त्वाची ठिकाणे आहेत. महाराष्ट्रातील नांदेड जिल्ह्यातील माहूर हे ठिकाण दत्तात्रेयांचे निद्रास्थान म्हणून प्रसिद्ध आहे. माहूर रेणूका मातेच्या मंदिरासाठी देखील ख्यात आहे. रेणूका माता जमदग्नी ऋषींची पत्नी, तर परशुरामाची आई. परशुराम भगवान विष्णूचा सहावा अवतार मानला जातो. परशुराम शिवभक्त होता. भगवान शिवाने परशुरामाला युद्धकलेत प्रशिक्षण देऊन निपूण केले होते आणि परशु (कुऱ्हाड) हे शस्त्र दिले होते.

माहूरचे एक वैशिष्ट्य म्हणजे येथे साधू पुरुषांनी स्थापन केलेले अनेक मठ आढळतात. भक्तगण या वेगवेगळ्या मठांत उतरून मुक्काम करत असतात व रेणूका माता, दत्तात्रेय तसेच अनसूया मातेचे दर्शन घेत असतात. या मठांवर भक्तांची राहण्याची आणि जेवणाची व्यवस्था विनाखर्च होते. भक्तगण तीर्थयात्रा पूर्ण करून परतत असताना स्वेच्छेने जे काही दान देतात ते दान साधू व मठाधिपती आनंदाने स्वीकारतात. या मठांवर गरिब व श्रीमंत असा भेद केला जात नाही व त्यांना समान वागणूक दिली जाऊन त्यांची उत्तम सोय केली जाते. आपण दत्तात्रेयांशी संबंधित इतर स्थानांची माहिती पुढील प्रकरणांमध्ये घेणारच आहोत. त्याचप्रमाणे माहूर विषयी देखील सविस्तर चर्चा करणार आहोत.

आपणास दत्त जन्माविषयीच्या कथा भागवत पुराण, ब्रह्मपुराण, वासुदेवानंद सरस्वतीकृत (टेंबे स्वामी) श्री दत्तमाहात्म्य आदी ग्रंथांमधून मिळते. या तिन्ही ग्रंथांमध्ये अत्रिऋषी हे दत्तात्रेयांचे पिता, तर महान ऋषीपत्नी सती अनसूया माता ही दत्तात्रेयांची माता असा उल्लेख येतो. अत्रिऋषी हे ब्रह्मदेवाचे मानसपुत्र होते असे संदर्भ आपणास हिंदू धर्मग्रंथांमध्ये आढळतात. ब्रह्म पुराणानुसार अत्रिऋषींनी पुत्रप्राप्तीसाठी तपश्चर्या केली असता त्यांना सोम, दत्तात्रेय व दुर्वास असे तीन पुत्र, तर शुभनेत्री नामक कन्या प्राप्त झाली अशी माहिती मिळते.

भागवत पुराणातील कथेनुसार अत्रिऋषी आपली पतिव्रता पत्नी सती अनसूया मातेसोबत ऋथ पर्वतावर जातात व तेथे आपले पिता ब्रह्मदेव यांच्या सांगण्यानुसार निवास करू लागतात. अत्रिऋषी हे एक महान तपस्वी व विद्वान असे ज्ञानपूर्ण ऋषी होते. अर्थात प्राचीन काळातील सर्वच ऋषींचे हे वैशिष्ट्य होते की, ते अविरतपणे तप व ध्यानधारणा करत असत. तसेच ते

वेद (ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद आणि अथर्ववेद), उपनिषदे व इतर धर्मसाहित्यात निपूण असत. त्यांच्या ज्ञानाचे व प्रज्ञेचे तेज सूर्यालाही फिके पाडत असे हे विधान करणे वावगे ठरणार नाही. ऋषी-मुनींच्या तपश्चर्येच्या दाहात तिन्ही लोकांना (पाताळ, पृथ्वी व आकाश) झळ पोहोचवण्याची शक्ती असे. तर असे हे अत्रिऋषी निर्विदना नदी वाहत असलेल्या व अशोक आणि पळसाच्या वृक्षांच्या वनराईने नटलेल्या शांतरम्य ऋथ पर्वतावर तप करू लागले. त्यांची तपश्चर्या एवढी खडतर आणि कडक होती की, ते एकाच पायावर उभे होते व फक्त वायुभक्षण करत होते. त्यांची मनोमनी इच्छा होती की, त्यांना एक तेजस्वी मूल व्हावे. त्यांच्या तपश्चर्येतून जो ताप व दाह निर्माण होत होता त्यामुळे तिन्ही लोकांना त्रास होऊ लागला होता. शेवटी ब्रह्मा, विष्णू व शिव हे तीन देव त्यांच्यासमोर प्रकट झाले. अत्रिऋषींनी त्यांना आपण संतानप्राप्तीसाठी तप करत असल्याचे सांगितल्यावर या त्रिमूर्तींनी त्यांना तीन पुत्र होतील असा वर दिला. हे तीन पुत्र म्हणजे ब्रह्माने दिलेला सोम, विष्णूने दिलेला श्री दत्त, तर शिवाने दिलेला दुर्वास हे होत.

दत्त जन्माची कथा आपणास वासुदेवानंद सरस्वती ऊर्फ टेंबेस्वामी यांनी लिहिलेल्या 'श्री दत्त माहात्म्य' या ग्रंथात देखील वाचावयास मिळते. या कथेचा सार पुढीलप्रमाणे आहे : अत्रिऋषी व अनसूया माता हे आदर्श पती-पत्नी असतात. अत्रिऋषी हे महान ज्ञानी पुरुष, तर अनसूया माता एक आदर्श पतीव्रता होती. अत्रिऋषी व अनसूया माता यांना संतान नसते. त्यामुळे अत्रिऋषी ऋथ पर्वतावर तप करण्यास सुरुवात करतात. त्यांच्या तपश्चर्येमुळे ब्रह्मा, विष्णू व शिव हे तीन देव प्रसन्न होतात व हे तीन देव अत्रिऋषींना अपत्यप्राप्ती होईल असा वर देतात. यानंतर अत्रिऋषी आणि अनसूया माता आपल्या आश्रमात परततात. एकदा नारदमुनी अत्रिऋषींच्या आश्रमात येऊन तेथील आदरातिथ्याचा स्वीकार करून जातात. हिंदू धर्मग्रंथांप्रमाणे नारदमुनी सुद्धा ब्रह्मदेवाचे पुत्र होत व ते ब्रह्मचारी असून भगवान विष्णूचे परम भक्त होते. त्यामुळेच लोकप्रिय धार्मिक मालिकांमध्ये व चित्रपटांमध्ये नारदाचे पात्र करणाऱ्या नटांच्या तोंडी 'नारायण नारायण' असे शब्द दिलेले असतात. असो. तर ब्रह्मर्षी नारदमुनी अत्रिऋषींच्या आश्रमात जाऊन त्यांच्या व अनसूया मातेच्या सेवेने भारावून जातात. त्यानंतर नारदमुनी त्यांचे अत्रिऋषींच्या आश्रमातील अनुभव व प्रामुख्याने सती अनसूया मातेचे सत्त्व व पतिव्रता धर्म यांची स्तुती देवी सावित्री (ब्रह्मदेवाची भार्या), देवी लक्ष्मी (भगवान विष्णूची पत्नी) आणि देवी पार्वती (भगवान शिवाची अर्धांगिनी- पार्वती मातेचे उमा असेदेखील नाव आहे) यांच्यासमोर करतात. त्यामुळे या तीन देवांच्या भार्या त्यांच्या पतींना सती अनसूया मातेचे सत्त्वहरण करण्यासाठी हट्ट धरतात. या तिन्ही देवांना आपल्या भार्यांचा हा स्त्रीहट्ट पूर्ण करण्यासाठी ब्राह्मणवेशात अत्रिऋषींच्या आश्रमात प्रकट व्हावे लागते. जेव्हा हे तीन देव ब्राह्मणरूपात आश्रमात अवतरतात तेव्हा अत्रिऋषी स्नान व संध्येसाठी नदीवर गेलेले असतात. इकडे हे तिन्ही देव अनसूया मातेकडे भिक्षा मागतात. साध्वी अनसूया माता जेव्हा भिक्षा देण्यासाठी येते तेव्हा हे ब्राह्मण (ब्रह्मदेव, भगवान विष्णू आणि भगवान शिव) तिला विवस्त्र अवस्थेत भिक्षा वाढण्यास सांगतात. त्यावेळी अनसूया माता समजून जाते की, हे ब्राह्मण साधारण नसून ते देवच असणार. सती अनसूया माता यावेळेस कमंडलूतील जल या तीन देवांवर शिंपडते व तात्काळ त्यांचे रूपांतर लहान बालकांमध्ये होते व आपसूकच अनसूया मातेस पान्हा फुटतो व ती प्रेमाने त्यांना दूध पाजते. आश्रमात परतल्यानंतर या बालकांना पाहून अत्रिऋषींना कळून चुकते की, हे तीन बालक म्हणजे साक्षात ब्रह्मा, विष्णू व शिव होत. तद्नंतर या देवांच्या पत्नी आपापल्या पतींना परत नेण्यास येतात व हे त्रिमूर्ती देव अत्रिऋषींना संतानप्राप्तीचा वर देतात.

अहंकारी आणि क्रोधी माणसाची गणना ज्ञानी माणसात होऊ शकत नाही.

त्यानुसार त्यांना ब्रह्मापासून चंद्र, शिवापासून दुर्वास ऋषी तर विष्णूपासून दत्त असे तीन पुत्र प्राप्त होतात.

आपणास दत्तजन्माविषयीच्या कथा कावडी बुवा यांनी लिहिलेल्या 'दत्तप्रबोध' या ग्रंथात, श्री गुरू चरित्रात, तसेच ब्रह्मपुराणात देखील वाचावयास मिळतात. अत्रिऋषींचे पुत्र म्हणून दत्तात्रेयांना 'आत्रेय' म्हणतात.

श्री दत्तात्रेय भगवानास रुद्राक्ष फार प्रिय आहे. आपण दत्तात्रेयाची देवघरातील चित्रे वा फोटो पाहिले तर आपल्या चटकन लक्षात येते की, दत्तगुरुंच्या जटांभोवती व गळ्यात रुद्राक्षाची माळ असते. यावरून असे म्हणणे वावगे ठरणार नाही की, दत्तसंप्रदायात रुद्राक्षाला अतिशय महत्त्व आहे. भगवान दत्तात्रेयाच्या भक्तांनादेखील रुद्राक्षाची माळ फार आवडते व दत्तभक्त मोठ्या भक्तिभावाने रुद्राक्षमाळ गळ्यात घालतात व ती हातात घेऊन जप देखील करतात. रुद्राक्षाचा वृक्ष म्यानमार, थायलंड, मलेशिया, नेपाळ, भारत आदी देशांमध्ये आढळतो. भारतामध्ये आसाम, बंगाल, बिहार, कर्नाटक, मध्य प्रदेश, महाराष्ट्र आदी राज्यांमध्ये रुद्राक्षाचे झाड सापडते. महाराष्ट्रात म्हटले तर हा वृक्ष प्रामुख्याने कोकणपट्टीत असल्याचे जाणवते. रुद्राक्षाच्या झाडाची साल गडद करड्या रंगाची व त्यावर बारीकशा चिरा व छिद्रे असतात. रुद्राक्षाच्या फळाचे साधारणपणे उन्हाळा व पावसाळा हे मोसम समजले जातात. गोसावी आणि भाविक हे पूजेसाठी व गळ्यात तसेच जपमाळेसाठी जो रुद्राक्ष वापरतात तो साधारणपणे गोलाकार असतो. या गोल रुद्राक्षावर उंचवटे आणि पाच खाचा व फळाच्या आत पाच कप्पे, तसेच पाच बिया असतात. पाचापेक्षा कमी वा जास्त खाचा असलेल्या रुद्राक्षाला भाविकांमध्ये विशेष करून जास्त मागणी असल्याचे जाणवते. या रुद्राक्षाचे लाकूड चिवट व मजबूत असते व त्याचा वापर विविध वस्तू बनविण्यासाठी केला जाऊ शकतो. एवढेच नव्हे तर, या रुद्राक्षातील गर औषधी मानला जातो व तो अपस्माराचे झटके आणि मेंदूशी निगडित आजारांवर गुणकारी असल्याचे मानले जाते. रुद्राक्षाचा अजून एक प्रकार म्हणजे लंबगोलाकार रुद्राक्ष होय. हे रुद्राक्षाचे झाड सह्य पर्वत रांगा, कर्नाटकात कारवार, कुर्ग आदी ठिकाणी व अजून दक्षिणेकडे गेले तर निलगिरी, अन्नामलाई, तसेच दक्षिण केरळमध्ये आढळते. या वृक्षाचे रुद्राक्ष साधारणपणे मे महिन्यात पिकतात. हा रुद्राक्ष दोन्ही बाजूला थोडासा दबलेला असतो व जेथे सपाट असतो तेथे यावर उंचवटे म्हणजेच पुटकुळ्या असतात. या रुद्राक्षाचे औषधी गुण म्हणजे हा अपस्मार, विषमज्वर व संधीवात आदी आजारांवर उपयुक्त असल्याचे म्हटले जाते. हा रुद्राक्ष देखील गोल रुद्राक्षाप्रमाणे माळी बनविण्यासाठी वापरला जातो. तसेच या रुद्राक्षाच्या झाडाचे लाकूड सुद्धा मजबूत असून, त्यापासून फळ्या बनवता येतात ज्या वेगवेगळ्या कामांसाठी उपयुक्त आहेत.

अशाप्रकारे रुद्राक्षाचे फळ व लाकूड बहुउपयोगी आहे. त्यामुळेच हिंदू धर्मात यास फार महत्त्व दिले आहे. हिंदू धर्माचे हे एक वैशिष्ट्य आहे की, या धर्मात विविध वृक्षे व त्यांचा मानवी जीवनात असलेला उपयोग पाहून त्यांना अनन्यसाधारण महत्त्व देण्यात आले आहे. हा मुद्दा धरून येथे नारळाच्या झाडाचे देखील उदाहरण देता येईल. नारळाच्या झाडाला भारतीय संस्कृतीत मानवी गरजा पूर्ण करणारा कल्पवृक्ष म्हटले आहे. कारण या वृक्षाचा प्रत्येक भाग मानवासाठी उपयुक्त ठरतो. हिंदू धर्मात वृक्षांना असलेले महत्त्व व ते किती पूजनीय आहेत याचा प्रत्यय संत तुकारामांच्या एका अजरामर अभंगातील 'वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे' या पंक्तीवरून येतो. तर आपला मूळ मुद्दा असा होता की, रुद्राक्ष हा ब्रह्मा, विष्णू व महेश या त्रिमूर्तीचे एकत्रित मनमोहक रूप असलेल्या दत्तात्रेयास प्रिय आहे. या त्रिमूर्तीमध्ये भगवान शिवाचा देखील समावेश आहे व हे सर्वज्ञात आहे की, भोळ्या शंकराला सुद्धा रुद्राक्ष आवडतो. भगवान शिवाच्या जटांमध्ये, गळ्यात व

दंडाभोवती आणि हाताच्या मनगटावर रुद्राक्षाच्या माळा असतात.

दत्तगुरूंना गाय खूप आवडते. दत्तगुरूंच्या पाठीमागे आपण गाय असलेली पाहतो. गायीस हिंदू धर्मात अतिशय पवित्र मानलेले आहे. गायीचा उल्लेख वैदिक काळापासून आलेला आहे. वैदिक काळापासूनच गोधनास अनन्यसाधारण महत्त्व देण्यात आले आहे. गायीचे वर्णन पुराणांमध्ये 'मानवाच्या सर्व इच्छांची पूर्ती करणारी कामधेनू' असे आलेले आहे. गायीस हिंदू धर्मात दैवी व परोपकारी समजले जाते. त्यामुळे गायीला पूजनीय मानलेले असून, तिचे रक्षण करणे ही एक नैतिक जबाबदारी आणि धार्मिक कृत्य गणले जाते. गायीपासून आपणास दूध, दही, लोणी, गोमूत्र आणि शेण मिळते; ज्यास 'पंचगव्य' देखील म्हणतात. या पाचही गोष्टी फार शुद्ध समजल्या जातात. भारतीय लोकांना व प्रामुख्याने हिंदूंना दूध, दही, लोणी व लोण्यापासून बनविलेले तूप खूप आवडते व यापासून तयार केलेले विविध पदार्थ देखील भारतीयांमध्ये लोकप्रिय आहेत. गायीचे गोमूत्र व शेण पवित्र मानले जाते. गोमूत्र अशुद्ध गोष्टींना शुद्ध करते व त्यात औषधी गुण असतात अशी हिंदूंची निस्सीम श्रद्धा आहे. त्यामुळेच बरेचसे हिंदू नियमितपणे गोमूत्राचे प्राशन करताना आढळतात. त्याचप्रमाणे पूजाअर्चा करताना सुद्धा पुरोहित वर्ग गोमूत्राचा वापर करतात. गायीचे शेण शतकानुशतके घर सारवण्यासाठी वापरले जाते. तसेच शेण वाळवून बनविलेल्या शेण्या चुलीत व होम-हवनात वापरल्या जातात. गायीच्या शेणापासून बनविलेल्या शेण्यांचा धूर औषधी मानला जातो. गायीचे दूध हे सकस आहार मानले जाते. गायीच्या दूधापासून तयार केलेले दुग्धजन्य पदार्थ मानवी शरीरास पोषक असतात. या सर्व कारणांमुळे गायीला हिंदू धर्मात मातेसमान मानले आहे. प्राचीन काळी गुप्त राजघराण्यातील राजांनी गोहत्येस गहन गुन्हा म्हणून जाहीर केले होते. २० व्या शतकात अनेक हिंदू संस्थानिकांनी आपल्या संस्थानात गोहत्याबंदी करणारे कायदे केलेले असल्याचे निदर्शनास येते. असो. पुराणांमध्ये कामधेनूचा उल्लेख आला आहे. कामधेनूस सर्व इच्छापूर्ती करणारी पवित्र गाय मानलेले आहे. एका कथेनुसार दक्षाचे जावई कश्यप ऋषी व त्यांची पत्नी सुरभी (जी दक्ष प्रजातीची कन्या होती) यांची कन्या रोहिणी हिला शूरसेनापासून कामधेनू झाली होती. वेताळ व कामधेनू यांचा पुत्र नंदी होय. नंदी भगवान शिवाचे वाहन होय. कामधेनूस नंदिनी असेदेखील म्हणतात. कामधेनू पांढऱ्या रंगाची असून तिचे चार स्तन हे पुरुषार्थ, तर चार पाय हे वेद आहेत असे वर्णन येते. दुसऱ्या एका पुराणकथेनुसार जेव्हा देवांनी व आसुरांनी समुद्रमंथन केले तेव्हा जी चौदा रत्ने बाहेर आली त्यापैकी एक म्हणजे कामधेनू होती. येथे आपण समुद्रमंथन व त्यानंतर समुद्रातून चौदा रत्ने बाहेर आली असा उल्लेख केला. समुद्रमंथन करावे लागण्याचे मुख्य कारण म्हणजे दुर्वास ऋषींनी देवांचा राजा इंद्र याला दिलेला शाप हे होय. यामागची एक पौराणिक कथा अशी आहे की, एकदा दुर्वास ऋषींनी इंद्राला सुगंधी हार दिला. इंद्राला तो हार खूप आवडला व त्याने हर्षभरीत होऊन तो हार त्याचे वाहन असलेल्या ऐरावत हत्तीच्या गळ्यात घातला. ऐरावत त्या हाराच्या सुगंधाने चिडला व त्याने आपल्या गळ्यातील हार सोंडेने काढून जमीनीवर भिरकावून दिला. त्यामुळे दुर्वास ऋषी क्रोधीत झाले व त्यांनी इंद्राला, तसेच देवांना असा शाप दिला की, ते त्यांचे राज्य (स्वर्ग), शक्ती आणि कीर्ती गमावून बसतील. या शापामुळे ऐरावताचा स्मृतीभ्रंश झाला. लक्ष्मी मातेने स्वर्ग सोडून क्षीरसागराच्या तळाशी जाणे पसंत केले. अशाप्रकारे लक्ष्मी क्षीरसागरात गेल्यामुळे देवलोकीचे सर्व वैभव नाहीसे झाले. चंद्र देखील लुप्त पावला. एवढेच नव्हे तर, देवांचा आसुरांनी पराभव केला. त्यामुळे देवांनी या सर्व समस्यांवर तोडगा काढण्याची भगवान विष्णूला प्रार्थना केली व त्यांनी देवांना क्षीरसागराचे

मंथन करून अमृत बाहेर काढून ते प्राशन करण्याचा उपाय सांगितला. याचे कारण देवांनी अमृत प्राशन केल्यावर त्यांना त्यांची पूर्वीची शक्ती प्राप्त झाली असती. त्यामुळे देवांनी समुद्रमंथन करण्याचे ठरविले. यात आसुरांनी देखील सहभागी होण्याचे ठरविले. भगवान विष्णू कूर्म रूपाने क्षीरसागराच्या तळाशी जाऊन बसले. त्या भगवान विष्णूरूपी कूर्माच्या पाठीवर मंदार पर्वत ठेवण्यात आला. मंदार पर्वताला भगवान शिवाच्या गळ्यातील वासुकी सर्प दोरखंड म्हणून गुंडाळण्यात आला व त्याच्या तोंडाकडे असुर, तर शेपटीकडे देव उभे राहिले आणि वासुकीच्या मदतीने मंदार पर्वताला घुसळून समुद्रमंथन करू लागले. समुद्रमंथन सुरू झाल्यावर पुढील रत्नं बाहेर पडली- हलाहल (विष) हे भगवान शिवाने प्राशन केले व पार्वती मातेच्या सहाय्याने आपल्या गळ्यात ठेवले. त्यामुळे भगवान शिव 'नीलकंठ' म्हणून प्रसिद्ध झाले. त्यामुळेच भगवान शिवाच्या आरतीमध्ये, 'देवी दैत्यी सागरमंथन पै केले। त्यामाजी जे अवचित हलाहल उठले। ते त्वा आसुरपणे प्राशन केले। नीलकंठ नाम प्रसिद्ध झाले।' या ओळी येतात. ऐरावत- हा दैवी हत्ती क्षीरसागराकतून बाहेर आल्यावर पुन्हा इंद्राकडे गेला, उच्चश्रैवा अश्व (या पांढऱ्याशुभ्र सातमुखी अश्वाला घोड्यांचा राजा म्हटले आहे), कामधेनू (कामधेनूला सप्तर्षींनां देण्यात आले), अप्सरा (या स्वर्गात गेल्या व त्या इंद्राच्या दरबारात नृत्य-गायन करू लागल्या), पारिजाताचे झाड हे इंद्राने स्वतःसाठी स्वर्गात ठेवले. कालांतराने पारिजाताच्या वृक्षासाठी श्रीकृष्ण आणि इंद्र यांच्यात युद्ध झाले. कारण हा वृक्ष सत्यभामा आणि रुक्मिणी या श्रीकृष्णाच्या पत्नींना हवा असतो. शेवटी श्रीकृष्ण पारिजाताला पृथ्वीवर आणण्यात यशस्वी होतो. असे म्हटले तर वावगे ठरणार नाही की, फक्त याच वृक्षाची जमीनीवर सडा पडलेली फुलं देवपुजेला वापरतात. (अन्यथा इतर इतर फुले आपण स्वतः हाताने तोडून देवाला वाहतो), विष्णूचे शारंग धनुष्य (या धनुष्याने भगवान विष्णू अधर्माचा संहार करतात), विष्णूचा पांचजन्य शंख (हा शंखनाद करून विष्णू अधर्माविरूद्धचा युद्धनाद करतात), विष्णूचा कौस्तुभ मणी (हा मणी विष्णूच्या गळ्यातील माळेत असतो), चंद्र (हा भगवान शिवाच्या जटांमध्ये असतो), लक्ष्मी (धन-संपत्तीची देवता) व अलक्ष्मी (दुर्दैव वा आपत्तीची देवता), धन्वंतरी (देवांचा वैद्य) आणि समुद्रमंथनातून सर्वात शेवटी आलेले रत्न म्हणजे अमृत होय. ही झाली समुद्रमंथनाची कथा. तर आपला मूळ मुद्दा असा होता की, दत्तात्रेयांना गाय फार आवडते. त्यामुळे ती त्यांच्यासोबत नेहमीच दिसते. एवढेच नाही तर आपणास कामधेनूचा पुत्र नंदी हा देखील भगवान शिवासोबत नेहमीच दिसतो. त्याचप्रमाणे ऋषी-मुनींना गाय प्राणापेक्षाही जास्त प्रिय होती असे निदर्शनास येते. त्यामुळेच आजही भारतीयांना व प्रामुख्याने हिंदूंसाठी गाय हा प्राणी फक्त प्राणी नाही तर ते गायीला माता मानतात. भगवान दत्तात्रेय आपल्या जवळ सतत गाय ठेवून हाच संदेश भक्तांना देत असतील असे म्हणणे सयुक्तिक ठरेल.

औदुंबराचा वृक्ष हे भगवान दत्तात्रेयांचे वसतीस्थान मानले जाते. त्यामुळे दत्तभक्तांना हे झाड जीव की प्राण आहे. अनेकदा भक्तांनी दत्तमंदिराच्या शेजारी वा आसपास औदुंबराचे झाड लावलेले असते. बोलीभाषेत औदुंबरास 'उंबर' असेदेखील म्हणतात. या वृक्षाचे फायदे जाणून घेतल्यास हिंदू धर्म वैज्ञानिक आहे असे म्हणणे वावगे ठरणार नाही. निदान या धर्माच्या विद्वानांना व अनुयायांना निसर्गातील काही वैज्ञानिक वा शास्त्रीय गोष्टी निरिक्षणातून तरी ठावूक होत्या यात वाद नाही. त्यामुळेच दत्तगुरूंचा औदुंबराशी संबंध जोडून या वृक्षात त्यांचा वास असतो असे म्हटले गेले असावे; जेणेकरून सामान्यजनांना या वृक्षाचा कसा उपयोग आहे व त्यामुळे या वृक्षाचे फक्त संवर्धनच होऊ नये तर तो मोठ्या प्रमाणात लावण्यात यावा ही त्यामागची भूमिका असावी. औदुंबराचे झाड म्यानमार, श्रीलंका, तसेच भारतात

प्रामुख्याने सापडते. हे बहुधा नदी किनारी वा पाणथळ असलेल्या जागी आढळते. याची सावली गडद व शीतल असते. त्यामुळे ग्रामीण भागात एका गावाहून दुसऱ्या गावी जाणारे वाटसरू या झाडाच्या छायेत क्षणभर विसावतात. या वृक्षाचे वैशिष्ट्य म्हणजे याला फळांचे गुच्छ येतात. बरेचसे लोक औदुंबराच्या कच्च्या फळांची भाजी बनवतात व पिकलेली तांबूस-जांभळ्या रंगाची फळे खातात. पक्षीदेखील औदुंबराची वा उंबराची फळे खातात. या वृक्षाचे लाकूड मजबूत असून ते विविध उपयोगी वस्तू बनविण्यासाठी वापरात येते. सर्वात महत्त्वाचे म्हणजे या वृक्षाचे विविध भाग औषधी असून त्यांचा वापर अमांश, मधुमेह, पित्तविकार, मासिक अतिस्राव, मूळव्याध आदी व्याधींवर वापरले जातात. तसेच भूकवाढीसाठी व प्राण्यांचे काही आजार बरे करण्यासाठी या वृक्षाचा उपयोग होतो. औदुंबराचा वापर यज्ञात समीधा म्हणून देखील करतात, किंबहुना औदुंबराची समीधा सर्वश्रेष्ठ मानतात. यावरून भारतीयांना या वृक्षाचे रोजनिशितल्या जीवनातील महत्त्व कळून त्यांनी त्याचा संबंध देवांशी व प्रामुख्याने दत्तत्रेयांशी जोडला असावा. औदुंबराच्या पौराणिक कथांविषयी म्हटले तर, औदुंबराचा संबंध भगवान विष्णूच्या चौथा अवतार असलेल्या नरसिंहाशी आहे. हिरण्यकश्यपू या दैत्याचा पुत्र प्रल्हाद हा परम विष्णूभक्त असतो. परंतु हिरण्यकश्यपू आसुराला हे पसंत नसते. तो भक्त प्रल्हादाला विष्णूच्या नावाचा जप बंद करण्यास सांगतो. मात्र प्रल्हाद त्याचे म्हणणे ऐकत नाही. हिरण्यकश्यपू आपली बहीण होलिका हिला प्रल्हादाला अग्नीत जाळून टाकण्यास सांगतो. कारण तिला अग्निपासून मृत्यू येणार नाही असे वरदान असते. होली(ळी) प्रल्हादाला घेऊन अग्नीत बसते. परंतु तरीही त्याला काही होत नाही. मात्र भगवान विष्णूच्या भक्ताला अग्नीत जाळण्याचा प्रयत्न केल्यामुळे ती स्वतः भस्म होते. अशी कथा सांगितली जाते की, या घटनेची आठवण म्हणूनच होळी जाळून होलीकेचा अंत झाल्याचा आनंद साजरा केला जातो. आपल्या भक्ताला अशाप्रकारे त्रास दिल्यामुळे भगवान विष्णू क्रोधित होतात व नरसिंहाचा अवतार घेऊन हिरण्यकश्यपूचा वध करतात. नरसिंह अवताराचे वैशिष्ट्य म्हणजे या अवतारात भगवान विष्णूचे मुख हे सिंहाचे व शरीर पुरुषाचे आहे व ते हिरण्यकश्यपूचा वध त्याला मांडीवर घेऊन, दरवाजाच्या उंबरठ्यावर बसून, आपली नखे त्याच्या शरीरात खूपसून करतात. हिरण्यकश्यपूचा अशातऱ्हेने अंत केल्यावर त्याच्या पोटातील विषामुळे नरसिंहाच्या शरीराचा दाह होतो व तो शमविण्यासाठी ते आपला हात व नखे औदुंबराच्या (उंबराच्या) फळात घालतात व त्यांचा दाह शांत होतो. या पौराणिक कथेवरून हे अधोरेखित होते की, प्राचीन काळापासून भारतीयांना व हिंदूंना औदुंबराच्या वृक्षाचा गुणधर्म थंड असल्याची माहिती होती असे सिद्ध होते. तर असा हा वृक्षराज दत्तगुरूंना व त्यांच्या भक्तांना खूपच आवडतो. दत्तगुरूंचे अनेक महान अवतारी पुरुष आणि असंख्य निस्सीम भक्तगण औदुंबराच्या छायेत बसत व भगवंताचे नामस्मरण करत असत अशी माहिती आपणास मिळते.

दत्तत्रेयांना भस्म प्रिय आहे. भस्म हे हिंदू संस्कृतीत वैराग्याचे लक्षण समजले जाते. दत्तात्रेयाच्या त्रिमूर्तीमधील तीन मुखांमध्ये एक मुख हे भगवान शिवाचे आहे. भगवान शिवाचे भस्मावर विशेष प्रेम आहे. भगवान शिव आपल्या कपाळावर व शरीरावर इतरत्र भस्म लावतात. भस्माला विभूती असेदेखील म्हणतात. काही लोक असे मानतात की, विभूती ही मंत्र व तंत्राच्या सहाय्याने जादूटोणा करण्यासाठी वापरतात. मात्र आपल्या असेही निदर्शनास येते की, विभूती लहान मुलांना बरे वाटत नसल्यास भक्तीभावाने देवाचे नाव घेऊन त्यांच्या कपाळावर लावतात, जेणेकरून त्यांना बरे वाटावे. मृत व्यक्तींना मंत्राग्नी दिल्यानंतर जो दाहसंस्कार केला जातो व त्यानंतर जी राख वा रक्षा उरते तिला 'चित्ताभस्म' असे म्हटले जाते. श्रद्धाळू हिंदूंमध्ये अशी धारणा आहे

की, चित्ताभस्म भगवान शिवाला फार आवडते. हिंदू धर्मीयांसाठी व प्रामुख्याने शैव पंथियांसाठी म्हणजेच भगवान शिवाच्या भक्तांसाठी भस्म ही अतिशय पवित्र व प्रिय रक्षा आहे. भस्माविषयीचा उल्लेख अगदी ऋग्वेदिय ब्रह्मकार्यातदेखील आलेला आढळतो. यात भस्म कशाप्रकारे धारण करावे याविषयी माहिति दिल्याचे निदर्शनास येते. यात असे म्हटले आहे की, भस्म हे उजव्या हाताच्या मधल्या तीन बोटांनी प्रथम कपाळावर व तद्नंतर चेहरा, हृदय, कंठ, नाभी, पाय इत्यादी ठिकाणी लावावे. भस्माविषयीच्या दोन पौराणिक कथा प्रसिद्ध आहेत. यातील एक कथा वीरभद्राशी, तर दुसरी दुर्वास ऋषींशी संबंधित आहे. वीरभद्र म्हणजे भगवान शिवाने सतीमाता दक्षाने (सतीमातेचे पिता) केलेल्या यज्ञकुंडात सती जातात तेव्हा दक्षाला दंड करण्यासाठी आपल्या जटा जमीनीवर आपटून तयार केलेला त्याचाच बलाढ्य अंश होय. तर विरभद्राशी निगडित भस्माची कथा अशी की, एकेवेळेस देव व ऋषीगण भगवान विष्णूच्या दर्शनासाठी जात असताना वणव्यात सापडतात व त्यांची जळून रक्षा होते. त्यावेळेस वीरभद्र त्याठिकाणी आला व त्याने आपल्या स्पर्शाने अग्निला शमविले, तसेच त्याची आकाशात जाणारी ज्वालादेखील गिळून टाकली. त्यानंतर त्याने देव व ऋषींच्या रक्षेवर मंत्रून भस्म टाकले व त्यांना जिवंत केले. अशाप्रकारे वीरभद्राने देव व ऋषींना जिवंत केल्यानंतर त्यांना अनुक्रमे एक सर्प व राक्षस गिळून टाकतो. परंतु वीरभद्र त्यांना भस्माच्या सहाय्यानेच जिवंत करतो. त्यामुळेच भस्माला ‘त्रायुष’ असेसुद्धा म्हटले जाते. दुर्वास ऋषींची भस्माशी निगडित कथा अशी आहे की, ते स्वर्गात जात असताना त्यांना वाटेत नरक लागतो. तेथे पापकर्म केलेल्या जीवांना कठोर शिक्षा झाल्यामुळे त्यांना त्रास व यातना होत असतात व ते आक्रोश करत असतात. दुर्वास ऋषी हा आवाज ऐकून आत वाकून पाहतात त्यावेळी त्यांनी शरीरावर जे भस्म लावलेले असते त्याचे काही कण नरकातील त्या पिचत पडलेल्या जीवांवर पडतात व त्यामुळे त्यांना होणारा त्रास बंद होतो. त्यामुळे देव व इंद्र आश्चर्यचकित होतात. त्यावेळेस भगवान शिव त्यांना सांगतात की, ‘दुर्वास ऋषींच्या अंगावरील काही भस्म नरकातील त्या जीवांवर पडल्यामुळे त्यांच्या यातना किंबहुना नरक यातना बंद झाल्या.’ अशाप्रकारे भस्म म्हणजे दाहनाशक व औषधीगुण असलेली पवित्र रक्षा आहे असे श्रद्धाळू हिंदू मानतात. दक्षिण भारतात स्त्रियादेखील कपाळाला भस्म लावताना आढळतात. त्याचप्रमाणे वीरशैव पंथाच्या लोकांसाठी भस्माचे फार महत्त्व आहे. साधू व संन्याशी लोक साधारणपणे आपल्या संपूर्ण शरीराला भस्म लावतात. कारण भस्मामुळे त्यांचे थंडी-वाऱ्यापासून रक्षण होते. गुरुचरित्रात देखील चित्ताभस्माचा उल्लेख आहे व भस्माविषयीची एक कथा आहे. ही कथा अशी की, काही चोर एका व्यभिचारी ब्राह्मणाला मारून टाकून त्याचे प्रेत गावाबाहेर टाकून देतात. काही वेळाने तेथे एक भस्मात लोळलेला श्वान (कुत्रा) येतो व त्या ब्राह्मणाच्या मृतदेहाला स्पर्श करतो व प्रेताला भस्म लागल्यामुळे तो ब्राह्मण कैलासवासी होतो. तर असे हे पवित्र मानले गेलेले व विविध धार्मिक विधींसाठी महत्त्वाचे असलेले, तसेच औषधी गुण असलेले भस्म दत्तगुरूंना व अर्थात त्यांच्या भक्तगणांना फार प्रिय आहे.

दत्तगुरू आपल्या भक्तांना मनोभावे पूजा केल्यास लगेच पावतात व त्यांचे दुःख दूर करून मनोकामना पूर्ण करतात अशी निस्सीम श्रद्धा भक्तांमध्ये आहे. दत्तात्रेय पितरांच्या त्रासातून देखील मुक्ती देतात अशी धारणा आहे. हिंदू धर्माचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे की, एकाच देवाची अनेक नावे असतात. त्याप्रमाणे दत्तात्रेयांची देखील पुढील विविध नावे आहेत- सिद्धराज, अत्रिविरद, ज्ञानसागर, अत्रेय, श्री गुरू, योगिराज, नरहरी, अवधूत, दिगंबर व आदिगुरू. योगसाधना तसेच अध्यात्मात दत्तगुरूंचे मार्गदर्शन महत्त्वाचे ठरते. अशाप्रकारचे संदर्भ आपणास हिंदू धर्मग्रंथांमध्ये आढळतात.

महाराष्ट्रातील संत परंपरेमध्ये संत ज्ञानेश्वर, संत एकनाथ, संत रामदास व मुक्तेश्वर हे दत्तभक्त होते असे संदर्भ आपणास आढळतात. एकनाथ महाराजांनी तर त्रिगुणात्मक त्रयमूर्ती दत्त हा जाणा। त्रिगुणी अवतार त्रैलोक्य राणा । ही दत्तात्रेयाची लोकप्रिय आरती देखील रचली आहे. एवढेच नव्हे तर संत तुकारामांनी सुद्धा दत्तगुरूंवर अभंग रचना केल्याचे निदर्शनास येते. या लेखाचा शेवट संत तुकारामांच्याच खालील अभंगाने करू या.

तीन शिरे, सहा हात । त्या माझा दंडवत ।।
काखे झोळी, पुढे श्वान । नित्य जानव्हीचे स्नान ।।
माथा मोठे, जटाभार । अंगी विभुती सुंदर ।।
शंख, चक्र, गदा हाती । पायी खडावा गर्जती ।।
तुका म्हणे, 'दिगंबर । त्या माझा नमस्कार' ।।

**संदर्भ**


- मराठी विश्वकोश
- मराठी संस्कृतीकोश
- दारिद्र्य, दुःख, संकटनाशक श्रीदत्त उपासना : प्रिया मालवणकर
- श्रीदत्त परिक्रमा : क्षीतिज पाटकुले
- दत्त संप्रदायाचा इतिहास : रा चिं ढेरे
- श्री दत्त माहात्म्य : श्री वासुदेवानंद सरस्वती टेंबेस्वामी महाराज विरचित
- अनुभूती 'दत अनुभूती'ची : आनंद कामत


**– सहा. प्राध्यापक सुभाष गं. शिंदे**
उपप्राचार्य व इतिहासविभाग प्रमुख
विप्रमंचे जोशी-बेडेकर महाविद्यालय (स्वायत्त), ठाणे.
भ्रमणध्वनी : ९८२०३२८२२६
Email : subhashinscotland@gmail.com

•••

(पृष्ठ क्र. ५ वरून -**एक आगळंवेगळं तीर्थक्षेत्र**)

लहानपणी देवीला दिलेल्या वचनातून, शपथेतून ते जराही विचलित झाले नाहीत. उलट अंदमानातील क्रांतीकारकांना त्यांनी अन्यायाविरुद्ध लढण्याचे आत्मबल दिले.

सावरकर केवळ लढवय्ये क्रांतिकारक नव्हते. ते स्वातंत्र्यवीर तर होतेच, त्याचबरोबर ते विज्ञाननिष्ठही होते. समाजसुधारक होते. आध्यात्मिक ज्ञानाने परिपूर्ण होते आणि त्यांना सरस्वतीचा फार मोठा वरदहस्तही लाभला होता. ते फार मोठे वैचारिक साहित्यिकही होते. १८५७ चा इतिहास, 'कमला'सारखे महाकाव्य, 'संन्यस्तखड्ग' नाटक, 'माझी जन्मठेप' आत्मचरित्र, 'काळेपाणी' कादंबरी, 'जोसेफ मॅझेनीचे चरित्र' ... अशा साहित्याच्या अनेक पैलूंवर त्यांनी लेखन केले आहे हे तर खरंच, पण त्यांची अत्यंत उत्कट, भव्य, उदात्त, हृदयस्पर्शी प्रतिभा दिसून येते ती त्यांच्या काव्य सुमनांतून. ते खरे महाकवीच होते. सेल्युलर जेलमध्ये ज्या हातांनी कोलू पिसून, चाबुकाचे वळ पाठीवर झेलत घामाच्या, रक्ताच्या धारा सोसत होते त्याच हातांनी घायकुटाच्या काट्यांनी भिंतीचा कागद करून त्यावर नाजूक भावनांचे शृंगार रसाने नटलेले 'कमला' काव्य फुलवत होते आणि आपल्या स्मरणकुपीत साठवत होते. 'कमला, गोमांतक, जयोस्तुते, महाराज आपली कुठे निघाली स्वारी, अनादी मी अनंत मी', किती किती नावे घ्यावी? सगळी एकेक काव्यरत्नेच आणि 'सागरा प्राण तळमळला' हे तर जागतिक काव्याचा कोहिनूरच.

तर असे हे अंदमान, काळ्या पाण्यावरचे अष्टपैलू क्रांतिकारक, मातृभुमीचे सुपुत्र, तेजस्वी तारेच म्हणूनच 'दिव्यत्वाची जेथे प्रचीती तेथे कर माझे जुळती'.


**– शैलजा वासुदेव बेडेकर**
ठाणे

•••

# भाभा अणुकेंद्राची प्रशाला

*भारतातली सर्वाधिक प्रतिष्ठेच्या भाभा अणुसंशोधन केंद्राच्या प्रशालेबद्दल माहिती या लेखात दिली आहे- संपादक*

आजमितीची भारतातली सर्वाधिक प्रतिष्ठेची शाळा जर कोणती असेल तर ती 'भाभा अणुसंशोधन केंद्राची प्रशाला' होय. १९५७ साली डॉ. राजा रामण्णा यांच्या संकल्पनेतून आणि उपक्रमांतून या प्रशालेची सुरुवात झाली. आजवरच्या ६४ वर्षांच्या तिच्या अप्रतिहत प्रवासात या प्रशालेने सुमारे ८,००० वैज्ञानिक अधिकारी भारतास प्रशिक्षित करून दिलेले आहेत. मीही या प्रशालेच्या तेविसाव्या तुकडीचा एक विद्यार्थी आहे याचा मला खूप अभिमान वाटतो. या शाळेचे आणि तिच्या एका दिवसाच्या दैनंदिन व्यवहाराचे हे स्मृतीचित्र या लेखात उभे करण्याचा प्रयत्न केला आहे. मला विश्वास वाटतो की ते तुम्हाला आवडेल. भावी होतकरू विद्यार्थ्यांना प्रेरणादायीही ठरू शकेल.




१९५७ सालची गोष्ट आहे. होमी भाभा भारताच्या अणुकार्यक्रमाची मुहूर्तमेढ रचत होते. तेव्हा त्यांना जाणवली एक निकडीची गरज. ती होती त्या स्वप्नातील अणुकार्यक्रमास प्रत्यक्षात साकार करू शकतील अशा शास्त्रज्ञांची. देशाला हवे असलेले शास्त्रज्ञ देशातच उपलब्ध व्हावेत म्हणून त्यांनी वैज्ञानिक प्रशिक्षित करणारी एक प्रशालाच काढायचा निर्णय घेतला. त्यांचे निकटचे सहकारी असलेल्या डॉ. राजा रामण्णा यांच्याकडे या प्रशालेच्या निर्मिती आणि संचालनाचीही जबाबदारी त्यांनी सुपूर्त केली. ही प्रशाला देशभरातील प्रज्ञावान शास्त्रज्ञांना बोलावून संकल्पित अणुकार्यक्रमाच्या अनुक्रमानुसार योजिलेल्या कामांवर नियुक्त करे. त्यांना योजनेबर हुकूम कार्य अवगत करी. त्याकरता आवश्यक संशोधन करण्याची साधने जुळवून देई. त्यांचेवर संशोधकास आवश्यक ते सारे संस्कार करत असे. अणुसंशोधनासोबतच त्या अनुषंगाने इतर औद्योगिक गरजांच्या पूर्तीकरता इतरही प्रयोगशाळा लागत असत त्याही सोबतच आल्या. देशातली विदलनक्षम (अण्वंतर्गत ऊर्जाविमोचनार्थ केलेले अणुविदलन, ऍटोमिक फिजन) मूलद्रव्ये शोधून काढून, खाणींतून काढून, त्यांवर संस्करण करून त्यांपासून अणुइंधने घडवण्याचे प्रशिक्षणही इथे दिले जाई. अण्वंतर्गत ऊर्जाविमोचनाच्या कारखान्यांचे संकल्पन सिद्ध होई. इथे जे शास्त्रज्ञ तयार झाले त्यांनी पुढे भारतीय विजकीय नोंदितपेढीसारख्या (इलेक्ट्रॉनिक कॉर्पोरेशन ऑफ इंडिया-ई.सी.आय.एल.) देशांतर्गत आणि विदेशातीलही अनेक संस्थांचे नेतृत्व केले. आम्हाला तर ती आमची राष्ट्रसमर्पित कर्मशाळाच भासे. त्या स्वदेशी संशोधनाचे मोलाचे कार्य प्रवर्तित करणाऱ्या प्रशालेचीच तर ही हकिकत आहे.

**भाभा अणुसंशोधन केंद्राची प्रशाला**
**स्रग्धरा (अक्षरे–२१, यती–७,७,७)**

भाभांच्या योजनेला, मनुजबळ हवे, ते घडावे स्वदेशी
रामण्णा त्याचसाठी, जुळवत अवघी, योजना शिक्षणाची।
रामण्णांच्याच यत्ने, अवतरली जगी, ती 'प्रशाला' विकासी
शास्त्रज्ञांना करे ती, अवगत सगळी, योजिलेली कृतीही।।

संशोधी ती 'प्रशाला', सहजच घडली, व्यक्ती संस्कारशाळा
स्वप्ने साकार झाली, अणुलगत पुरी, शोध शाळाच आली।
द्रव्ये देशातली ती, विदलनक्षम जी, शोधली तीही गेली
प्रक्रीया सिद्ध झाली, अणुगत ऊर्जा, लोककार्या निघाली ।।

येथे जे सिद्ध झाले, सहज चमकले, सर्व देशात तेजे
त्यांनी राष्ट्रास विश्वे, अविरत झटुनी, थोर केले प्रयासे ।
काही उद्योगी गेले, विकसत सगळे, विश्व ते उद्यमाचे
काही गेले विदेशी, तिथेही चमकले, कीर्तीचे दीप झाले।।

ऐशी ही थोर शाळा, गमत मज असे, आमची यज्ञशाळा
जेथे आम्ही प्रयासे, जगच घडविले, देशी संशोधनाचे।।

१ सप्टेंबर १९७९ रोजी मी भाभा अणुसंशोधन केंद्राच्या ट्रेनिंग स्कूलच्या २३ व्या तुकडीतील इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंगचा प्रशिक्षणार्थी वैज्ञानिक अधिकारी म्हणून, ट्रॉम्बे येथील अणुशक्तीनगरातील प्रशाला वसतीगृहाच्या (ट्रेनिंग स्कूल होस्टेलच्या) दहाव्या मजल्यावरील 'डी' क्रमांकाच्या खोलीत दाखल झालो. तेव्हा माझे वय केवळ २१ वर्षांचे होते. योगायोगाची गोष्ट हीही होती की, आमच्या ट्रेनिंग स्कूलचे वयही तितकेच होते. वर्षभर मी आता तिथेच राहणार होतो. तेव्हापासूनच्या गेल्या चाळीस वर्षांत मला जे जे अनुभव मिळाले त्यांनी मी खूप समृद्ध झालो. तेव्हाचा मी आणि आताचा मी ह्यात जमीन-अस्मानाचे अंतर आहे. त्या रुजू होण्याची आठवण उजागर करण्याकरता, मी मला आठवते आहे तसे माझ्या त्या वेळच्या दिनचर्येचे काही तपशील लिहून काढत आहे. मनोरंजक वाटतील अशी आशा आहे.

प्रशाला वसतीगृहाची चौदा मजली इमारत त्या काळातील अद्ययावत असली तरी, तेव्हा अटॅच्ड टॉयलेटची प्रथा अजून आलेली नव्हती. एका मजल्यावरील दहा खोल्यांकरता, कॉरिडॉरच्या सेंट्रल ऍव्हेन्यूच्या बाजूला सामुदायिक प्रसाधनगृह (टॉयलेट) असे. मात्र तिथे कमोड होते. खोलीत केवळ एक टेबल, एक खुर्ची, एक पलंग, एक कपाट आणि एक सिलींग फॅन असे. इमारतीच्या चौदाव्या मजल्यावर एक कार्यकारी अधिकाऱ्यांचे उपाहारगृह आहे. त्या मजल्यावर स्वतः भाभांनी रेखाटलेली निरनिराळ्या शास्त्रज्ञांची उत्तमोत्तम रेखाचित्रे हारीने लावलेली आहेत.



अध्यापन प्रशाला वसतीगृह — *Training School Hostel*

सकाळी साडे-पाचला उठून प्रातर्विधी आटोपणे. मग खिडकीतून सर्वकाळ दिसत असलेल्या फुटबॉलच्या मैदानाभोवती तासभर धावणे. सात वाजता परतून तयार होणे. साडे-आठला नास्ता. पावणे-नऊला बसेस दारात उभ्या राहत. बरोबर नऊ वाजता भारतातील सारे भावी अणुशास्त्रज्ञ प्रशिक्षणार्थ सिद्ध होऊन त्या दोन बसेसमध्ये स्थानापन्न होत. त्यात अनेक मुलीही होत्या. नऊच्या आतच ट्रेनिंग स्कूलच्या दारात सगळे पटापट उतरतांना दिसत.



संध्याकाळी पाच वाजता त्याच बसेस मग परत होस्टेलला आणून सोडत असत. स्कूल हे अणुसंशोधन केंद्राच्या दक्षिण टोकाला होते, तर होस्टेल उत्तर दरवाजाबाहेर. त्यामुळे हा सगळा प्रवास अणुसंशोधन केंद्रातूनच आरपार असा होत असे. साडे-पाचला 'थापा'च्या (छे! ती काही थापाची टपरी नव्हती. वसतीगृहाचे ते अधिकृत उपाहारगृह होते. अत्यंत प्रशस्त आणि पंचतारांकित हॉटेललाही लाजवेल असे.) तिथे नास्ता मिळे. दर सोमवारी, परीक्षा झाल्यानंतर, संध्याकाळी 'वेस्टर्न स्टाईल डिनर' असे. ब्रेड, बटर, जेली, जाम, कस्टर्ड आणि जेवणानंतर चहा, कॉफी इत्यादींची ओळखच आम्हाला नव्हती. त्यामुळे त्याचेही अपरूप असे.

मग मोकळे होण्याला थोडासा अवसर मिळे. कुणी खेळायला जात. कुणी फिरायला. गप्पाटप्पा होत. मात्र प्रत्येकालाच अभ्यास करायचा असे. दर सोमवारी कुठल्या ना कुठल्या विषयाची परीक्षा होत असे. निरनिराळे बावीस विषय आम्ही वर्षभर शिकणार होतो. अणुभट्टीचे रसायनशास्त्र (रिऍक्टर केमिस्ट्री), आण्विक भौतिकशास्त्र (न्युक्लिअर फिजिक्स), ऊर्जासंयंत्र अभियांत्रिकी(पॉवर प्लँट इंजिनिअरिंग), तापांतरण(हिट ट्रान्फर), द्रवचालिकी (फ्लूयुईड मेकॅनिक्स), उपकरणन (इन्स्ट्रुमेंटेशन) ही काही नावे वानगीदाखल दिलेली आहेत. त्यामुळे टिवल्या-बावल्या करायला वेळच सापडत नसे. जिथे शिकणे अवघड वाटत होते, त्या ट्रेनिंग स्कूलमध्येच मी पुढील दहा वर्षांच्या आत शिकवू लागणार होतो, हे गुपित मात्र तेव्हा कुणालाच माहीत नव्हते!

मोहनकृष्ण, सुब्रमण्यम यांसारखे मातब्बर शिक्षक आपापले विषय शिकवण्यात अत्यंत निष्णात होते. सराईतपणे, पुस्तकही हाती न धरता मोठमोठाली डेरिव्हेशन्स खडूने फळ्यावर ज्या वेगाने उतरत असत, ती वहीत उतरवून घेताना हात पार दुखून जात असत. संध्याकाळीच ती आत्मसात करून घ्यावी लागत. टंगळ-मंगळ केली तर अभ्यासाची संधी पुन्हा मिळत नसे. बसमधून परततांनाही प्रात्यक्षिकांतून पाहिलेल्या गायगर-मुल्लर गणकाची किंवा तापांतरण गुणकाचीच (हीट ट्रान्स्फर कोईफिशंटचीच) चर्चा होत असे.

तेव्हा मोबाईल नव्हते. फोनही सहजी उपलब्ध नसत. परक्या गावात फोन करायचा तर 'पोस्ट ऑफिसात' जाऊन 'ट्रंककॉल बुक' करावा लागे. तेही अणुशक्तीनगरात थोडे दूरच होते. ती अनेक तासांची प्रक्रिया होती. आज पाठवलेले पत्र घरी पोहोचायला किमान आठ दिवस लागत! मग उत्तर येई तेव्हा पंधरवडा उलटून गेलेला असे. रोज संध्याकाळी परतल्यावर सगळ्यांची धाव पत्रपेटीच्या फलकाकडे असे. ज्यांची पत्रे आलेली असत ते खूश होऊन उत्तर लिहिण्याच्या मार्गी लागत. ज्यांची आलेली नसत, ते त्याच संधीचा उपयोग अतिरिक्त अभ्यासाकरता करून घेत. वसतीगृहाच्या पाठीमागे जी टेकडी आहे ना, ती प्रत्यक्षात खूप दूर आहे. काही किलोमीटर तरी असेल. मात्र आमच्यापाशी तेवढा वेळच नसे. त्यामुळे वर्षभर तिथे राहूनही मी त्या टेकडीवर गेलेलो नाही.

भारतभराचे सुमारे सव्वाशे विद्यार्थी आमचे सहाध्यायी होते. आम्ही मोकळेपणाने परस्परांशी बोलू लागायलाच अनेक आठवडे लागले. त्यात मराठीही मुले आहेत हे कळले. अत्यंत मोडक्यातोडक्या हिंदी आणि इंग्रजीत संभाषणे होत असत. अनोळखी विषय, अनोळखी मित्रांकडून, अनोळखी भाषांत समजावून घेतले जात असत. एकदा तर मजाच झाली. मला जेवणात

(पृष्ठ क्र.१९ वर)

# 'मास्तरकी'ची मास्टर-की

*५ सप्टेंबर रोजी देशाचे माजी राष्ट्रपती व तत्त्वज्ञ शिक्षक डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा वाढदिवस 'शिक्षक दिन' म्हणून साजरा केला जातो. त्यानिमित्त प्रशांत सुसर यांचा लेख- संपादक*

काय झालं...? बाळ रडत होतं....वूडवर्ड्स द्यायला सांग तिला.. तू लहान असताना मी ही तुला तेच देत होते... पिढ्यानपिढ्या असलेली विश्वासार्हता दाखवणारी ही दूरदर्शन वरील ग्राईप वॉटरची जाहिरात सगळ्यांना आठवत असेल. अशीच विश्वासार्हता असलेला आणखी एक घटक आहे तो म्हणजे बालकांना ज्ञानरुपी बाळगुटी पाजणारा शिक्षक. परंतु तो विश्वास आता हळूहळू कमी होत आहे हेही जाणवते. इथे 'परिवर्तन संसार का नियम है' हे विसरून कसं चालेल? तंत्रज्ञानाच्या क्रांतीने झपाट्याने बदलणाऱ्या या जगात काळानुरूप तोही बदलणारच. पूर्वीच्या गुरुजींचा 'सर'पर्यंत (व्हाया मास्तर) झालेला प्रवास तेच दर्शवतो. मात्र हा शाब्दिक बदल असला तरी मानसिक - भावनिकदृष्ट्या 'खरा शिक्षक' कधीच बदलत नसतो. त्यामुळे शिक्षकांना 'आदर्श' मानणारा एक मोठा वर्ग आजही समाजात आहे. परंतु त्यांना हिणवणारा, त्यांच्या कार्यकर्तृत्त्वावर शंका घेणारा एक नकारात्मक वर्ग वाढत चालला आहे. जो भावी पिढीच्या भविष्यासाठी घातक आहे. 'मास्तर' या शब्दातून उपरोधिकपणे गरळ ओकणाऱ्यांना त्याचा अर्थही माहीत नसतो. 'मास्टर' या इंग्रजी शब्दाचा मराठीत 'मालक, शिक्षक किंवा पारंगत' असा अर्थ होतो. त्याचा अपभ्रंश होऊन मास्तर झाला. 'मास्तर' म्हणजे जो 'माय'च्या स्तराला जाऊन शिकवतो.

जी किल्ली कोणतंही कुलूप उघडू शकते तिला 'मास्टर-की' असं म्हणतात. तसंच जे काम कोणीही करू शकत नाही ते मास्तर अगदी सहज करतात म्हणूनच कदाचित त्यांना 'मास्टरजी' म्हटलं जात असावं. त्यामुळे 'जिथे कमी तिथे आम्ही' हीच परिस्थिती शिक्षकांची आहे. येथे इतर कामे करण्याबाबत आक्षेप नाही; तर यामुळे मूळ कामापासून दूर जाऊन जे प्रतिमाभंजन होते त्याविषयी तीव्र नाराजी आहे. अध्ययन-अध्यापन या प्रक्रियेपासून दूर गेलेल्या शिक्षकांची पालक वर्गात किंवा समाजात हेटाळणी होणे हे अपरिहार्य आहे. त्यामुळेच एक दिवसाच्या 'टीचर्स डे' ने तो सुखावतो; मात्र दररोजच्या 'मास्तर डे' ने तो दुखावतो.

महाराष्ट्राला 'शैक्षणिक उपक्रमांची प्रयोगशाळा' म्हटले जाते. त्यामुळे येथे नवनवीन प्रयोग राबवले जातात.

त्यांची परिणामकारकता तपासण्याआधीच दुसरा उपक्रम तयार असतो. त्यामुळे शिक्षक-विद्यार्थी यांची अवस्था 'एक ना धड भाराभर चिंध्या' अशी होते. प्राथमिक शिक्षकाला सगळंच आलं पाहिजे या अट्टाहासापायी तो 'Jack of all trades but master of none' होऊन बसतो. इथे मला नारदमुनींची ती गोष्ट आठवते ज्यात वाटीतील तेल सांडू न देता नामस्मरण करायचे असते. एक तर नामस्मरण होईल किंवा तेल तरी सांडणार नाही. अशीच अवस्था शिक्षकांची होते आपल्याला डॉक्टर, इंजिनियर स्पेशलाइज्ड हवेत, शिक्षक मात्र सर्वसमावेशक, जनरलाइज्ड हवा. मग रिझल्ट तो काय येणार..? एखाद्याला इंग्रजी चांगले येते म्हणून तो गणितात तज्ज्ञ असेलच असं नाही. मग त्या

ज्ञानाचा उपयोग घेण्याऐवजी त्याला 'सब घोडे बारा टक्के' या न्यायाने कामाला लावलं तर रसभंग होणारच..

डिसले गुरुजींना तंत्रज्ञानात गती होती. त्यांनी पहिल्या पगारातून मोटारसायकल ऐवजी लॅपटॉप घेतला आणि लोकल ते ग्लोबल अशी झेप घेतली. त्यांच्या QR कोडचा फायदा जगभरातल्या विद्यार्थ्यांना झाला. असे कितीतरी डीसले गुरुजी आपल्या आजूबाजूला विद्यार्थ्यांसाठी धडपडत आहेत. गरज आहे ती त्यांना भौतिक, आर्थिक, मानसिक पाठबळ देण्याची.

परंतु 'सिस्टम' नावाची एक चौकट आहे जी आपण भेदू शकत नाही आणि 'पिंजरा' बनून 'मास्तर' त्यात अडकतो, तो सतत इतरांच्या इशाऱ्यावर नाचण्यासाठी!

दिल्ली सारख्या छोट्या राज्यात शासनाने मनात आणल्यावर आमूलाग्र बदल होऊ शकतो तर आपल्याकडे का नाही..?

शासन-शिक्षक-पालक आणि विद्यार्थी असा हा चौकोन आहे, ज्यायोगे शिक्षण क्षेत्रात बदल होऊ शकतो. शासन स्तरावर विचार केल्यास पुरेशा आर्थिक व भौतिक सुविधांचा अभाव, रिक्तपदे, बदली धोरण याबाबतची अनिश्चित ध्येयधोरणे, कागदी घोडे नाचवण्याची कायम असलेली इंग्रजी परंपरा यामुळे शिक्षकी पेशाबद्दल तरुणवर्गात कमालीची अनास्था निर्माण झाली आहे. आज गुणवान व कौशल्यपूर्ण युवा वर्गात स्वयंप्रेरणेने शिक्षक बनण्याचे प्रमाण नगण्य आहे.

डी एड, बी एडच्या रिक्त जागांवरून ते दिसतेच आहे. स्वातंत्र्यानंतरच्या पंच्याहत्तर वर्षांनंतरही आपण प्राथमिक शाळांसाठी एक शिपाई किंवा कारकून ही व्यवस्था उभी करू शकलो नाही.

तलाठी वा ग्रामसेवकांकडे एका क्लिकवर सातबारा, आठ अ मिळेल; मात्र एका दाखल्यासाठी शिक्षकाला आजही खर्डेघाशीच करावी लागते, का..? तर अजून पर्यंत शालेय रेकॉर्डचे डिजिटायझेशन होऊ शकले नाही. म्हणून शिक्षकांचा वेळ कारकुनी करण्यात वाया जातोय. समाजातून आणि समाज माध्यमातूनही नेहमी जाणवणारा रोष म्हणजे शिक्षकांना भरपूर पगार व सुट्या आहेत. या बाबत सांगावेसे वाटते की, हा पगार फक्त गेल्या दहा वर्षात वाढला असून तोही महागाईच्या प्रमाणात. बहुतेक शिक्षक हे सर्वसामान्य कुटुंबातील आहेत. त्यांना गरिबीची व गरिबांच्या मुलांची जाणीव आहे. इतर भ्रष्ट व मुजोर अधिकारी व कर्मचाऱ्यांपेक्षा 'त्याची' नैतिकता अजून टिकून आहे. मग त्याने थोडंसं सुखवस्तू जीवन जगलं तर काय बिघडलं...?

(बालकांसाठी तो रोल 'मॉडेल' असतो. त्यामुळे आचार, विचार व उच्चार यात तारतम्य ठेवण्याची जबाबदारी त्याचीही असते. शेवटी आपलं काम हाच आपला आरसा असतो.) याबाबत शाळेत असताना वाचलेलं एक वाक्य आठवते की, न्यायाधीशांना भरपूर वेतन व भत्ते या सुविधा असाव्यात जेणेकरून ते समाधानी राहून आपले काम करतील व गैरमार्गाकडे वळणार नाहीत! त्यालाच अनुसरून ही बाब शिक्षकांना लागू होत नाही का..? याबाबत खाजगी शाळा व विनाअनुदानित तत्त्वावरील शिक्षकांची अवस्था आपण पाहतच आहोत.

सुट्यांच्या बाबतीत सांगायचे तर शिकणे आणि शिकवणे हे 'येरागबाळ्याचे काम नव्हे' हे गेल्या दीड वर्षात आपण अनुभवतो आहोतच. ऑनलाइन शिक्षणाने काहीअंशी शिक्षणाला सहारा दिला असला तरी तो पर्याय पूरक आहे, परिपूर्ण नाही, हे त्यातून उद्भवणाऱ्या हानीकारक समस्यांमुळे कळते. त्यामुळे 4G,5G च काय तर कोणतीच टेक्नॉलॉजी गुरुजीला पर्याय होऊ शकत नाही, हा धडा आपण शिकलोय. शिक्षण ही एक मानसशास्त्रीय प्रक्रिया आहे. त्यामुळे 'पी हळद नि हो गोरी' असे अघोरी उपाय करून भागत नाही. त्यासाठी

रोपट्यांप्रमाणेच मुलांनाही ज्ञानरूपी खतपाणी घालून पुरेसा वेळ द्यावा लागतो. तेव्हाच ती बहरतात.

ज्ञान हे नेहमी प्रवाही असतं आणि म्हणून शिक्षक हा आजन्म विद्यार्थी असावा लागतो. त्याने स्वतःला सतत अपडेट ठेवले पाहिजे. त्यासाठी शिक्षकांना वाचन, मनन, चिंतन, लेखन, निरीक्षण व नियोजन या गोष्टींसाठी पुरेसा वेळ हवाच. त्यासाठी या सुट्ट्यांचा उपयोग शिक्षकांनी करावा अशी अपेक्षा आहे.

पण आजकाल आपल्याला सगळं झटपट हवे असते. झटपट फक्त मॅगी बनते, विद्यार्थी नाही! त्यासाठी पालकांनी संयम, सामंजस्य व संवाद ही त्रिसुत्री अवलंबावी. यासाठी समाजाचा शिक्षकांवर व शिक्षकांचा स्वतःवर विश्वास असायला हवा. विद्यार्थ्यांनीही ज्ञानपिपासू बनले पाहिजे. कृतीयुक्त शिक्षण हेच खरं शिक्षण आहे. त्यासाठी शिक्षण व व्यवहारज्ञान यांची सांगड घालून मन, मनगट व मेंदू मजबूत केला पाहिजे. शेवटी शिक्षकांच्या प्रति येणाऱ्या काही नकारात्मक प्रतिक्रियांविषयी एवढेच सांगावेसे वाटते की, 'अपवाद' हे प्रत्येक क्षेत्रात असतात. त्यासाठी संपूर्ण शिक्षकीपेशाला बदनाम करणे योग्य ठरणार नाही. काम न करणाऱ्यांसाठी नियंत्रण करणारी यंत्रणा आहेच. मात्र त्यापेक्षाही महत्त्वाचे आहे ते चांगलं काम करणाऱ्यांच्या पाठीवर पडणारी कौतुकाची थाप. यंत्रमानव घडवण्यापेक्षा 'माणूस' घडवणे हे खरे शिक्षणाचे काम आहे.

डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन म्हणतात, 'आपण पक्ष्याप्रमाणे आकाशात उडायला शिकलो, पाण्यात माशाप्रमाणे पोहायला शिकलो, पण जमिनीवर माणसाला माणसाप्रमाणे वागवायला शिकलो तरच खऱ्या अर्थाने शिकलो असे म्हणता येईल. 'खरा शिक्षक' म्हणजे मला सोनाराच्या दुकानात एका कोपऱ्यात बसून प्रामाणिकपणे आपलं काम करणारा कुशल कारागीर वाटतो; जो त्याचं काम एकाग्रतेने, कष्टाने व चोखपणे करतो. तेव्हाच घडवले जातात सुंदर अलंकार. आपण मात्र कौतुक करतो ते त्या काचपेटीतील अलंकारांचे. त्यामागील झिजलेल्या हातांना विसरून...!'

कोविड काळात विद्यार्थ्यांची झालेली हानी भरून काढण्यासाठी शिक्षकांना दुप्पट जोमाने काम करावे लागणार आहे. म्हणून लवकरच ज्ञानमंदिरे उघडो... आणि शिक्षक-विद्यार्थी अद्वैत घडो...हीच सदिच्छा..

– **प्रशांत सुसर**
बुलडाणा

●●●

---

(पृष्ठ क्र. १६ वरून - **भाभा अणुकेंद्राची प्रशाला**)

कांदा हवा होता. मल्याळी वेटरला कसे काय कळेल कांदा म्हटले तर? असे वाटून मी त्याला 'प्याज' मागू लागलो. नागपूरचा 'प्याज' मुंबईच्या हिंदी भाषेत अजून दाखलच झालेला नाही. मग काहीच उजेड पडत नाही म्हटल्यावर मी विचार केला की ह्याला इंग्रजी कळत असावे. मी म्हणालो 'ओनियन' चाहिये! छे! तरीही चेहऱ्यावर किंचितही ओळखीचे भाव नव्हते. अखेरीस रंजीस येऊन मुझे ये चाहिये म्हणून मी 'कापलेला कांदा'च हाती घेतला. अरे तो फिर कांदा बोलो ना! आता मात्र मी थक्क झालो होतो. इथे जसे कांद्याला कांदा म्हणतात, तसेच दह्यालाही दहीच म्हणतात.

अनुभवांची समृद्धी केवळ तांत्रिक अनुभवांची नव्हती. व्यावहारिक अनुभवांनीही मी समृद्ध होत गेलो. मात्र आयुष्याने मला जे जे धडे शिकवले ते ते मी अत्यंत गांभीर्याने शिकून घेत राहिलो शिरोधार्य मानून.

– **नरेंद्र गोळे**
१०४ दत्तात्रय प्रसन्न, जोशीवाडी,
टिळकपथ छेदगल्ली, टिळकनगर,
डोंबिवली (पू.) - ४२१२०१
भ्रमणध्वनी : ९९३०५०१३३५
Email : narendra.v.gole@gmail.com

---

# मराठवाडा मुक्ती संग्राम दिन

*१७ सप्टेंबर २०२१ रोजी साजरा करण्यात येणाऱ्या 'मराठवाडा मुक्तिसंग्राम दिना'निमित्त सौ. सविता जयंत धर्माधिकारी यांचा लेख – संपादक*

आपला भारत देश इंग्रजांच्या ताब्यात होता. देशाला स्वातंत्र्य मिळण्यासाठी अनेक देशभक्तांनी कार्य केले. इंग्रजांनी देशाला स्वातंत्र्य देण्याचे कबूल केले त्यावेळी भारतात ५६५ संस्थानिक होते. त्यापैकी ५६२ संस्थाने भारतात विलीन झाली. तीन संस्थाने स्वतंत्र राहू इच्छित होती. त्यापैकी एक हैदराबादचा निजाम मराठवाडा निजामाच्या राज्यात होता. हैदराबाद संस्थान हे भारतीय संघराज्यात न येता स्वतंत्र मनमानी कारभार करू लागले, लोकांवर अत्याचार करू लागले. त्याच्या जुलुमाला जनता कंटाळून गेली होती.

हिंदू विरोधी कारवाया करणारी त्या काळातील निजामाची एक मोठी संघटना म्हणजे,'इत्तेहादूल मुसलमीन संघटना'. लातूरचा कासीम रझवी हा त्या संघटनेचा प्रमुख होता. या संघटनेत काम करणाऱ्या सैनिकाला 'रजाकार' म्हणत. रझाकार म्हणजे खुशीने काम करणारा. सुमारे दोन लाख रझाकारांची ही सेना होती. ते हिंदूंवर अत्याचार करत असत.

रझाकारांच्या अत्याचाराचा प्रतिकार करण्यासाठी अनेक कार्यकर्ते एकत्र आले. अशा काही क्रांतीकारक संघटना व क्रांतिकारकांची माहिती आपण जाणून घेऊ या हीच 'मराठवाडा मुक्ती संग्राम दिनी' त्यांना आदरांजली.

या मराठवाडा मुक्ती संग्रामात अग्रेसर असलेल्या क्रांतिकारक संघटना आर्यसमाज, हिंदू महासभा व राष्ट्रीय काँग्रेस सर्वांनी मिळून प्रतिकार करायचे ठरवले.

खेडोपाडीही रझाकारांच्या अत्याचाराचे प्रमाण वाढले होते. त्यावर प्रतिकार करण्यासाठी व मराठवाड्याला मुक्ती मिळावी म्हणून देशभक्तीने प्रेरित होऊन अनेक कार्यकर्ते समोर आले त्यात महिलांचाही समावेश होता.

प्रत्येक जिल्ह्यात रजाकारांविरुद्ध लढण्यासाठी कॅम्पस् तयार झाले. त्यांमध्ये सशस्त्र प्रशिक्षण पण दिले जाई. यात लातूर जिल्हा अग्रेसर होता. या कामी अनेक तरुण पुढे आले. त्यापैकी व्यंकटेश भगवानराव खेडगीकर ह्या तरुणाने तर शिक्षणाचे काम सोडून या मराठवाडा मुक्तीसंग्रामाच्या लढ्यात स्वतःला झोकून दिले. असामान्य कार्यामुळे तेच 'स्वामी रामानंद तीर्थ' म्हणून पुढे ओळखले जाऊ लागले. दुसरे आर्यसमाजचे भाई बन्सीलाल. ते आपल्या भाषणांतून तरुणांना मराठवाडा मुक्ती संग्रामासाठी एकत्रित करण्याचे काम करत. यांच्या भाषणाला वेद-प्रकाशजी आले होते; पण काही कारणाने बन्सीलाल आलेच नाहीत. रजाकारांना भाई बंशीलालची सभा असल्याचे समजले होते. त्यांच्या भाषणासाठी आलेल्या वेदप्रकाशजींना १५० रझाकारांनी घेरले व त्यांची हत्या केली. नांदेड येथील अर्धापूरचे गोविंदराव पानसरे कुंडलवाडी येथे भाषण करून परत येताना त्यांची बैलगाडी अडवण्यात आली. रजाकारांनी त्यांना घेरले आणि म्हणू लागले, 'तुम मे से कोन है पानसरे'? त्यावेळी गाडीतून पुंडलिकराव पाटील उत्तरले, 'मै हूं पानसरे' पाटलावर तलवारीने वार करण्यात आले तेव्हा खरे पानसरे म्हणाले, 'मै हूं पानसरे'. रजाकारांनी त्यांनाही गाडीतून खाली ओढले व ठार मारले. या प्रसंगावरून देशभक्तांचे एकमेकांवर असलेले प्रेम दिसून येते.

गोरगरीब, तरुण, म्हातारे, विद्यार्थी, शिक्षक हे सारे स्वामीजींच्या भाषणाने भारावून गेले. कॉलेजचे

तरुण या लढ्यात सामील झाले. त्यातील काही तरुणांना पोलिसांनी पकडून कारागृहात टाकले व त्यांना बेदम मारू लागले. त्यातील एका विद्यार्थ्याचे नाव रामचंद्र होते. त्याला पोलिस फटके मारत होते व तो 'वंदे मातरम' म्हणत होता. अगणित फटके खाऊनही 'वंदे मातरम' म्हणणे सोडले नाही. त्यावेळेपासून त्याचे नाव 'रामचंद्र वंदे मातरम' पडले.

पंडित रामचंद्र देहलवी यांचे भाषण एकदा ऐकले की माणूस देशभक्तीने भारावून जात असे. कृष्ण प्रसाद हिंदू धर्म सोडून इस्लाम धर्म स्वीकारणार होते, पण पंडित रामचंद्र देहलवी यांच्या भाषणामुळे त्यांनी हिंदू धर्म सोडला नाही.

निजामापासून मराठवाड्याला स्वतंत्र करण्यासाठी अग्रस्थानी असणारे स्वामी रामानंद तीर्थ, गोविंदभाई श्रॉफ, अनंतराव भालेराव, श्यामराव बोधनकर, दिगंबरराव बिंदू, गोविंदराव नानल, विनायकराव चारठाणकर, भगवानराव गांजवे, काशिनाथराव वैद्य, शंकरराव चव्हाण, साहेबराव बारडकर, भाई केशवराव धोंडगे, लक्ष्मणराव सोनकांबळे अशा कितीतरी लोकांमध्ये लातूरचे भुजंगराव देशपांडे, अनंत राघवेंद्र आराध्ये, चंद्रशेखर वाजपेयी, बाबासाहेब परांजपे यांचा समावेश होता. जीवनधर शहरकर या सोळा वर्षांच्या युवकाने सोलापूर येथे हात बॉम्ब तयार करण्याचे प्रशिक्षण घेतले व शस्त्र पुरवण्याचे काम केले. त्याकाळी शिंदीची लागवड मोठ्या प्रमाणात केली जात असे शिंदीची झाडे तोडून टाकणे, जाळून टाकणे अशी त्रासदायक कृत्य निजाम सरकार करत असे. अशाच एका गोळीबारात किसनरावांना हौतात्म्य आले. त्यांची पत्नी गोदावरी सूडाने पेटली. त्या म्हणाल्या, 'नवऱ्याच्या हत्येचा बदला घेईन, तरच खरी मालकीण!' ह्या संग्रामात महिलांचाही वाटा मोठा आहे. त्या बंदूक चालवायला शिकल्या होत्या. त्यांचा मुलगा माधवराव कँपवर (हे निजामविरोधी कँपस् जिल्ह्याच्या सीमेवर असत.) लढत होता. बाईंनी घरात कोंडून घेतले. घराला बाहेरून रजाकारांनी घेराव घातला होता. बाईंनी बंदूक उचलली. खिडकीतून गोळीबार सुरू केला. एक रझाकार मारला. रझाकारात खळबळ माजली आणि रझाकार चिडले. त्यांनी घरच पेटून दिले. गोदावरीबाईंचा त्यात अंत झाला. त्या हुतात्मा झाल्या.

तुळजापूरकडील नांदगावच्या सांबाबाई बीरा धनगर, पुंजाबाई पुंजाजी बुजुर्गे (ता. जाफराबाद), औरंगाबादकडील कोंडलवाडीच्या बाळूबाई गंगुलाल, नांदेडच्या लक्ष्मीबाई बाळाजी मयेकर, नागव्वाबाई अंबेसंगे या वीर स्त्रिया रझाकारांच्या गोळीबारात हुतात्मा झाल्या!

सिल्लोड तालुक्यातील रुक्मिणीबाई कोरडे यांनी (१९४०-४१) जंगलतोड वैयक्तिक सत्याग्रहात भाग घेतला. दोन वेळा तुरुंगवास भोगला.नंतर सुटका झाल्यावरही 'भूमिगत' राहून कार्य केले. वाईच्या गीताबाई चारठाणकर यांना शस्त्रे आणताना अटक झाली व नंतर सुटल्यावर 'भूमिगत' राहून कार्य केले. अशा या धडाडीच्या विरांगना!

शेळगी येथील त्रिवेणीबाई पाटलीण या चळवळीच्या जाण असलेल्या कार्यकर्त्या होत्या. कार्यकर्त्यांना त्या आर्थिक मदत करीत. त्यांच्या उदारपणामुळे कार्यकर्ते थक्क झाले. त्या म्हणत, ''मलाबी एक रायफल द्या. तुमच्याबरोबर लढता लढता मरेन बरे! कारण रझाकार माझी अब्रू लुटतील'. त्या काळी त्रिवेणीबाईंबद्दल बोलले जायचे, ''पाटलीण अतिशय सुंदर दिसायची, बाई गोरीपान, धारदार नाक, चमकदार व्यक्तिमत्त्व होते.त्यामुळे रजाकार तिच्यावर टपून होते.''

उमरगा तालुक्यातील गुंगोटी येथील सोनूबाई पाटलीण एक सुंदर स्त्री होती. तिला एक जमादार सतत त्रास देत होता. त्यामुळे एका कार्यकर्त्याने तिला एक 'युक्ती' सुचविली. ती एक दिवस आडावर पाणी भरीत होती. जमादार तेथे पटकलाच. बाईंनी त्याला पाहून लाजून मुरका मारला. जमादार खूश. त्याला वाटले बाई आपल्या हातात आली. बाईंनी सांगितले, 'अमूक

जागी जोंधळ्याच्या पिकात संध्याकाळी या. मी तेथेच आहेच'. जमादार घाईनेच उतावीळपणे गेला. जोंधळ्यात जमादाराने जवळ येऊन तिचा हात धरताच बाजूने ४-५ तरुण कार्यकर्ते उठले. जमादारावर सपासप शस्त्राने वार केले. सोनूबाईनेही त्याच्यावर कोयत्याने वार केले. जमादार यम दरबारी गेला.

स्त्रियांवर अत्याचार करून दहशत निर्माण करणे हे रझाकार करत. निजामाने राष्ट्रीय काँग्रेसवरची बंदी उठवली त्याची बातमी कळावी म्हणून रेडिओ स्टेशनची स्थापना केली. निजामसत्ता झुगारण्याच्या कामी महिलांचा सहभाग मोठा होता. त्यात प्रमीला कुलकर्णी, कुसुमताई, दगडाबाई शेळके टाकळी, प्रतिभाताई वैशंपायन, सुशिलाबाई दिवाण, लता बोधनकर, सीताबाई चारठाणकर, देशपांडे, आशाताई वाघमारे, डॉक्टर तारा परांजपे, सुनंदा जोशी, सुचित्रा वाघमारे, संगम लक्ष्मीबाई, विमल मेलकोटे, गंगुबाई देव इत्यादींनी जमेल ती कामे केली. प्रत्यक्ष बंदुका घेऊन, भूमिगत राहून, कोणी क्रांतिकार्याला अन्नपुरवठा करून, तर कोणी युद्धसाहित्य पुरवून मदत करीत असत.

मर्दानी दगडाबाई शेळकेने झाशीच्या राणीसारखे कार्य केले. जन्म कोलते टाकळी येथे. जालना धोपटेश्वर येथे लग्न झाले. लग्नानंतर त्यांनी भिल्लांकडून शस्त्रास्त्राचे शिक्षण घेतले. त्यांनी होमगार्ड ट्रेनिंग, त्यानंतर जंगल सत्याग्रह, झेंडा सत्याग्रहात सहभाग घेतला होता. त्यांना एक मुलगा होता. तो मुलगा अपंग होता आणि तो मुलगा पाठीवर बांधून झाशीच्या राणी सारखे त्या लढाया करत. शर्ट पँट घालून एका हातात बंदुक आणि दुसऱ्या हातात घोडा! पुरुषांप्रमाणे त्या कार्य करू लागल्या. वेळी-अवेळी घोड्यावर फिरण्यामुळे कुटुंबातून विरोध होऊ लागला. स्वतःचं बरं-वाईट होईल, आपण देशासाठी फिरतो, त्यामुळे आपल्या नवऱ्याचे कसे होईल म्हणून नवऱ्याचे दुसरे लग्न पसंदीने मैनाबाई नावाच्या मुलीशी लावून देणारी पहिली स्त्री! हा धाडसी निर्णय घेतल्याने लोक त्यांना नावं ठेवू लागली. पण त्यांनी त्याकडे दुर्लक्ष करून स्वतःला स्वातंत्र्य लढ्यामध्ये कार्य करण्यासाठी झोकून दिले. दगडाबाई दगडाच्या काळजासारखी असल्यासारखे वाटायचे. लोकांनी तिची खूप निंदा केली. मराठवाड्याला रजाकारापासून मुक्ती मिळाल्यावरच त्यांना समाधान लाभले. त्यांचा स्वातंत्र सेनानी म्हणून शेतकरी महिला मेळाव्याचे अध्यक्ष शरद जोशी यांनी गौरव केला.

वयाच्या ९८ व्या वर्षी २०१३ साली त्यांचे देहावसान झाले. स्वातंत्र्य सेनानी म्हणून सरकारी इतमामात त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आला.

१७ सप्टेंबर १९४८ रोजी निजाम शरण आला व मराठवाडा मुक्त झाला. थोर देशभक्तांच्या कार्याला यश आले. मराठवाड्याला स्वातंत्र्य मिळाले तो दिवस 'मराठवाडा मुक्ती संग्राम दिन' म्हणून आपण पाळतो.

मराठवाडा मुक्तिसंग्राम अजूनही संपलेला नाही असंच पुढे चालू आहे आणि हा संग्राम आपल्याला संपवायचा आहे तो म्हणजे मुक्ती गरीबी पासून, मुक्ती बेरोजगारी पासून, मुक्ती भूकमारी पासून, मुक्ती कुपोषणापासून, मुक्ती संसर्गजन्य रोगापासून, मुक्ती अस्वच्छतेपासून, मुक्ती आळशीपणा पासून, मुक्ती भ्रष्टाचारापासून! हा मुक्तिसंग्रामाचा लढा आपल्याला देशभक्ताप्रमाणे लढायचा आहे. चला! या साऱ्यापासून मुक्ती मिळवण्यासाठी आपण वचनबद्ध होऊ या. हा संकल्प पूर्ण करण्याच्या उद्दिष्टपूर्तीसाठी लढू या. तरच क्रांतिकारकांनी प्राणाची पर्वा न करता मिळवलेली मुक्ती वाया जाणार नाही.

**- सौ. सविता जयंतराव धर्माधिकारी**
इतिहास अभ्यासक शिक्षिका
जि प के प्रा शा कासारखेडा
भ्रमणध्वनी - ९४२१३६९७३७

# परिसर वार्ता

**- संकलित**

## सौ. आनंदीबाई जोशी इंग्रजी पूर्व प्राथमिक विभाग

### १५ जून २०२० ते ३१ जुलै पर्यंतचे उपक्रम

• १२ जून २०२१ – या वर्षी पूर्व प्राथमिक विभागात (नर्सरी ज्यूनियर व सिनियर) नवीन प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या पालकांसाठी परिचयात्मक सभेचे (Orientation programme) आयोजन केले होते. झूम लिंकद्वारे या सभेला हजर असणाऱ्या पालकांना विभागप्रमुख सौ. अपर्णा वरूडकर यांनी विद्या प्रसारक मंडळ व त्यांच्या विविध संस्थांची ओळख करून दिली. तसेच सौ. ए. के. जोशी शाळेच्या प्रगतीचा आलेख, शाळेच्या विविध उपक्रमांची महिती सचित्र करून दिली.

शैक्षणिक वर्ष २०२१ झाले पण सध्याच्या परिस्थितीमुळे ह्या वर्षीही शाळा आभासी माध्यमांद्वारे (Online) सुरू झाल्या. १५ जून २०२१ पासून नियमित वर्ग सुरू झाले.

• नर्सरी १०:३० ते ११:०० या वेळेत १ तासिका.
• ज्युनियर के. जी. चे १०:३० ते ११:३० या वेळेत २ तासिका.
• सिनियर के. जी. चे १२:०० ते १:०० या वेळेत २ तासिका.

इंग्रजी, गणित, परिसर अभ्यास (project) Art/ ADL ह्या विषयांचे वर्ग घेतले जातात.

हे वर्ग सुरू होण्याआधी पालकांना या विषयी आवश्यक असणारी माहिती (zoom link, ID ई.) whats app गृपवर देण्यात आली. ऑगस्ट महिन्यापासून सिनियर के. जी. साठी १:१० ते १:३० ही तिसरी तासिका सुरू करण्यात आली.

सर्व विभागांची शाळा ही प्रार्थना, हजेरी, दिवस व दिनविशेष ह्याने होते. नंतर शिक्षक मुलांना विषयवार शिकवतात. या तासिकांमधे शिकवल्या जाणाऱ्या संकल्पनांसाठी शिक्षक अनेक अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा (apps चा) उपयोग करतात.

• इंग्रजी – विषयांत मुलांना विविध रंगांची ओळख करून दिली जाते आणि मुलांना त्या रंगाचे कपडे घालायचे व त्या रंगाच्या वस्तू सांगायच्या किंवा दाखवायच्या असे उपक्रम घेतले जातात.

२५ जून २०२१ – लाल
२ जुलै २०२१ – निळा
९ जुलै २०२१ – पिवळा
१६ जुलै २०२१ – हिरवा

या प्रमाणे विविध रंगांचे दिवस साजरे केले.

- मुलांना विविध अक्षर ओळख (Aa to Zz) करून देताना त्या अक्षराची चित्रे दाखवून त्या अक्षरावरून सुरू होणारे गाणे असे उपक्रम घेतले जातात.
- व्याकरणातील संकल्पना (prepositions, pronouns, articles etc.) समजावून सांगताना मुलांना प्रत्यक्ष वस्तू व चित्रे दाखवली जातात.
- ज्युनियर के. जी. च्या मुलांनी खडूने पाटीवर लिखाणाला सुरवात केली.
- सिनियर के. जी. चे विद्यार्थी इंग्रजी व गणित या दोन विषयांचे लिखाण संबंधित वह्यांमधे करतात.

रोजच्या तासिकेत शिक्षक मुलांना त्या दिवसाचे लिखाण कसे करायचे या बद्दल मार्गदर्शन करतात.

• **गणित** – विषयात अंकांची, भूमितीच्या आकारांची (shapes) ओळख, तसेच गणना (counting) या सारख्या महत्त्वाच्या संकल्पना शिकवल्या जातात. एकास एक संगती (1:1 correspondence), क्रमवारी (seriation), एक, अनेक (one, few, many) अशा गणितातील संकल्पना प्रत्यक्ष वस्तू व चित्र दाखवून मुलांना शिकवल्या जातात.

• **चित्रकला (ART/ADL)**– मुलांना विविध विषयांवर चित्र काढणे, रोजच्या जीवनात उपयोगी असणाऱ्या कृती,– जसे कपड्यांच्या घड्या घालणे, इ. गोष्टी या तासिकेत घेतल्या जातात.

• **संगीत/गाणी** – संगीत ऐकणे, गाणी म्हणणे या गोष्टींमधून मुलांना आनंद मिळतो. दर गुरुवारी यासाठी अर्ध्या तासाची एक तासिका घेतली जाते. मराठी, हिंदी, इंग्रजी, गुजराथी अशा विविध भाषांतील गाणी शिकवली जातात. सणांना अनुसरून गाणी घेतली जातात. सिनियर के. जी. च्या मुलांना विविध वाद्यांची तोंडओळख करून दिली जाते.

• **शारीरिक शिक्षण** – शरीर सुदृढ रहाण्यासाठी नियमित खेळ व व्यायामाची गरज असते. म्हणूनच व्यायाम व खेळाची माहिती ज्यूनियर के. जी. च्या मासिक माहितीमधे (monthly plan) पालकांना whatsapp ग्रुपवर देण्यात येते.

सिनियर के. जी. साठी आठवड्यातून एकदा शारीरिक शिक्षणाची तासिका (zoom द्वारे) घेतली जाते.

• **२० जुलै – आषाढी एकादशी**

आषाढी एकादशी म्हणजे वारकऱ्यांचा विठ्ठल नामाचा गजर करत पंढरपूरच्या वारीचा प्रवास. मुलांना विठ्ठलाचे चित्र, लहान मुलांची दिंडी, विठ्ठल नामाचा गजर, श्लोक या सर्वांबद्दलची माहिती एका व्हिडिओद्वारे सांगण्यात आली.

सिनियरच्या प्रत्येक गटातून ४ विद्यार्थी निवडण्यात आले व त्यांना पुढीलपैकी विषयावर ५ – ७ वाक्ये बोलायला सांगितली गेली. 'पाणी वाचवा', 'झाडे वाचवा', 'प्लास्टिक वापर टाळा', 'कोरोना काळातील प्रतिबंधक उपाय'.

मुलांनी विषयांची व्यवस्थित तयारी करून उत्तम सादरीकरण केले.

• **२३ जुलै – गुरुपौर्णिमा**

आषाढ महिन्यातील पौर्णिमा गुरुपौर्णिमा म्हणून साजरी केली जाते. आई ही प्रत्येकाची पहिली गुरू आहे, नंतर वडील व घरातील इतर मोठ्या व्यक्ती, मग शाळेतील शिक्षक आपले गुरू असतात. म्हणून प्रथम आई व नंतर इतर सर्वांना वंदन केले पाहिजे असे शिक्षकांनी मुलांना सांगितले.

• **पालकांशी संवाद**

या शैक्षणिक वर्षाची पहिली पालक सभा zoom तंत्रज्ञानाचा वापर करून पुढील दिवशी घेतली गेली. पालकांच्या शंकांचे निरसन केले गेले.

नर्सरी – शनिवार ३ जुलै २०२१ (सकाळी १०:३० वाजता)

ज्युनियर के. जी. – शनिवार ३ जुलै २०२१ (सकाळी १०:३० वाजता)

सिनियर के. जी. – शनिवार १७ जुलै २०२१ (सकाळी १२:०० वाजता)

• **मासिक अभ्यासक्रम**

दर महिन्यात विविध विषयांतर्गत शिकवल्या जाणाऱ्या संकल्पनांची माहिती पालकांना whatsapp ग्रुपवर दिली जाते. तसेच शाळेच्या संकेतस्थळावर (वेबसाईट वर – www.vpmthane.org) पाठवली जाते.

• **कार्यपत्रिका (Worksheets)**

शिकवण्यात आलेल्या संकल्पनांची उजळणी म्हणून दर आठवड्याला एक कार्यपत्रिका (worksheet) त्या मुलांना सोडवण्यासाठी दिली जाते. इंग्रजी, गणित व परिसर अभ्यास या विषयांवर आधारित असतात. पालकांच्या whatsapp ग्रुपवर तसेच संकेत स्थळांवर पाठवल्या जातात.

यापुढील शैक्षणिक वर्षात असेच अनेक विविध उपक्रम राबवले जाणार आहेत.

## सौ. आनंदीबाई जोशी माध्यमिक विभाग

**सौ.आनंदीबाई केशव जोशी शाळेत योगा दिनाचे आयोजन २०२०-२०२१**

दिनांक २१ जून २०२१ रोजी ऑनलाईन पद्धतीने इयत्ता सातवीच्या विद्यार्थ्यांनी आंतरराष्ट्रीय सातवा योगा दिवस साजरा केला. योगा केवळ व्यायाम नाही, तर तो शरीर व मन एकत्र जोडण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करतो. या विषयी सजगता निर्माण व्हावी हा उद्देश हा कार्यक्रम साजरा करण्यामागे होता.

या प्रसंगी घंटाळी मित्र मंडळ, ठाणे या संस्थेच्या अध्यक्षा सौ. सुजाता भिडे यांचे स्वागत करण्यात आले. श्री. आनंद भिडे यांनी ताडासन, शवासन, उष्ट्रासन, वज्रासनांचे प्रात्यक्षिक सादर केले. सौ. भिडे यांनी बल आणि प्रतिकारशक्ती, आरोग्यपूर्ण जीवन यांचे महत्त्व सांगितले. विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमाला अत्यंत उत्साहाने प्रतिसाद दिला. त्याविषयी समाधानी प्रतिक्रिया दिल्या. योगा दिनाचा हा कार्यक्रम सर्वार्थाने बोधप्रद ठरला.

१) इयत्ता पाचवीसाठी १२ जुलै २०२१ या दिवशी डॉ. छाया भडकमकर यांचे 'निरोगी जीवनशैली' या विषयावर भाषण आयोजित केले गेले.

२) इयत्ता सहावीसाठी २७ जुलै २०२१ या दिवशी सौ. शिल्पा कुलकर्णी यांचे 'पक्षी' या विषयावर भाषण आयोजित केले गेले. पक्ष्यांची वैशिष्ट्ये, त्यांची जीवनपद्धती या विषयी स्लाईडच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना ओळख करून दिली गेली.

३) इयत्ता सातवीसाठी २३ जुलै २०२१ या दिवशी डॉ. सुधाकर आगरकर यांचे 'निकोला टेस्ला- एक नावीन्यपूर्ण अभियंता' या विषयावर भाषण आयोजित केले गेले. निकोला टेस्ला यांचे आयुष्य व त्यांचे कार्य याविषयी विद्यार्थ्यांना माहिती दिली.

४) इयत्ता आठवीसाठी २७ जुलै २०२१ या दिवशी डॉ. सुधाकर आगरकर यांनी 'ॲलन ट्युरिंग - एक बुद्धीमान गणिततज्ज्ञ' या विषयावर प्रेरणादायी भाषण आयोजित केले गेले.

५) इयत्ता नववीसाठी ३० जुलै २०२१ या दिवशी डॉ. सुधाकर आगरकर यांचे 'मॅडम क्यूरी : एक प्रयोगशील वैज्ञानिक' या विषयावर भाषण आयोजित केले गेले.

• लोकमान्य टिळक महाराष्ट्र विद्यापीठ आयोजित लो. टिळक या विषयावर आधारित (ऑनलाईन) वक्तृत्व स्पर्धेचा निकाल :

| विद्यार्थ्यांचे नाव | इयत्ता व तुकडी | संघ | क्रमांक |
|---|---|---|---|
| १) देवश्री कुलकर्णी | ८ वी अ | इंग्रजी | दुसरा |
| २) अनुश्री धारप | ६ वी अ | हिंदी | पहिला |

**स्काउट /गाईड**

**राज्य पुरस्कार प्राप्त विद्यार्थी २०२१**

१) निलभ पुष्कर शेजवलकर

२) अनुज राहुल दुसाने

३) स्वराज चौहान

४) अर्णव अमोल मोडक

५) संस्कार प्रमोद जाधव

६) अर्थव विक्रांत मुळे

• माजी मुख्याध्यापिका व माजी पर्यवेक्षिका कै. मॅडम रोशनजाल पटेल यांच्या स्मृतीदिनाप्रित्यर्थ इयत्ता पाचवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी २५ जून, २०२१ रोजी ऑनलाईन चित्रकला स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.

**स्वातंत्र्य दिनाचे आयोजन**

इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यानी दिनांक १५ ऑगस्ट २०२१ या स्वातंत्र्यदिनी कार्यक्रमाचे आयोजन ऑनलाईनद्वारे केले. कोविड विषाणूंचा जागतिक प्रसार झाला तेव्हा डॉक्टर, नर्सेस, पोलिस दल आणि इतर अनेक सामाजिक संस्था खंबीरपणे उभ्या राहिल्या. त्यांनी जो मदतीचा आणि निष्काम सेवेचा हात दिला त्यांच्याविषयीची कृतज्ञता व्यक्त करणाऱ्या व्हिडिओचे सादरीकरण केले. प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षपणे या महामारीच्या संकट काळात ज्यांनी मोलाची कामगिरी केली त्यांच्याविषयी देखील विद्यार्थ्यांनी आदर व्यक्त केल्यानंतर कार्यक्रमाची सांगता झाली.

**संस्कृत दिनाचे आयोजन**

संस्कृत या भाषेची वैभवशाली परंपरा आणि तिचे महत्त्व जाणून घेण्यासाठी दरवर्षी श्रावण पौर्णिमेला 'संस्कृत दिन' साजरा केला जातो.

यावर्षी शाळेत दिनांक २३ ऑगस्ट २०२१ रोजी संस्कृत दिन इयत्ता आठवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांनी दृक्-श्राव्य माध्यमाद्वारे साजरा केला. संस्कृत प्रार्थना, गाणी, सुभाषिते आणि नाटिका इत्यादी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. रसाळ आणि अर्थपूर्ण संस्कृत भाषेच्या या कार्यक्रमाचा आनंद सगळ्याच विद्यार्थ्यांनी घेतला.

या कार्यक्रमाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांना स्वत:ला सादर करण्याची मोठी संधी प्राप्त झाल्याबद्दल त्यांनी शाळेचे आभार मानले. विशेष म्हणजे हा संपूर्ण कार्यक्रम विद्यार्थ्यांनी संस्कृत भाषेतून सादरा केला.

**शिक्षक दिन**

डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या स्मृतीप्रित्यर्थ पाच सप्टेंबर हा 'शिक्षक दिन' म्हणून साजरा करण्याची प्रथा १९६२ पासून सुरू झाली.

सौ. ए. के. जोशी इंग्लिश मीडियम स्कूल येथे ६ सप्टेंबर रोजी शिक्षक दिन साजरा करण्यात आला. इयत्ता पाचवी ते दहावीचे विद्यार्थी सहभागी झाले होते.

कार्यक्रमाची सुरुवात प्रार्थनेने झाली. इंग्रजी, मराठी, हिंदी, संस्कृत या चारही भाषांत विद्यार्थ्यांनी भाषण केले. त्यानंतर काही विद्यार्थ्यांनी श्रेष्ठ गुरूंच्या आठवणी सांगितल्या.

२०२१ च्या बॅचच्या तीन विद्यार्थ्यांनी कोविडच्या काळात शिक्षकांनी त्यांना कसे योग्य मार्गदर्शन केले, ऑनलाईन शिक्षण कसे प्रभाविपणे विद्यार्थ्यांपर्यंत पोचवले याची चर्चा केली.


इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांनी डॉ. राधाकृष्णन् यांच्यावर आधारित माहिती PPT द्वारे सादर केली.

## जोशी-बेडेकर महाविद्यालय

**जोशी-बेडेकर कॉलेजमध्ये राष्ट्रीय खेळ दिन साजरा.**

**व्यायामात शिस्त आणि सातत्य हीच आरोग्याची गुरूकिल्ली**

ठाण्यातील विद्या प्रसारक मंडळाच्या जोशी-बेडेकर कला आणि वाणिज्य स्वायत्त महाविद्यालयात रविवारी मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त 'राष्ट्रीय खेळ दिन'



जिमखाना आणि स्पोर्ट्स समितीच्यावतीने साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान प्राचार्या डॉ. सौ. सुचित्रा नाईक मॅडम यांनी भुषविले. या प्रसंगी त्यांनी महाविद्यालयातील खेळाडू विद्यार्थ्यांना शुभेच्छा देऊन प्रोत्साहनपर मार्गदर्शन केले. यावेळी प्रमुख आयर्नमॅन आणि खेळाडू मिनेश कोळी म्हणाले की, खेळाडूंनी व्यायामातील सातत्य आणि शिस्त अंगी बाळगली तर ते आरोग्याच्या उंच शिखरावर पोहोचू शकतात आणि निरोगी जीवन जगू शकतात.

महामारीच्या काळात सुदृढ राहण्याचं महत्त्व त्यांनी आपल्या भाषणातून सांगितले. श्री. कोळी यांनी आजच्या करोना महामारीमध्ये सगळे जग थांबले असताना आपल्या वैयक्तिक जीवनात योग्य व्यायाम आणि आहारातून आपले जीवन अधिक समृद्ध व आरोग्यदायी कसे करू शकतो याचा कानमंत्र दिला. या कार्यक्रमात उपप्राचार्य सुभाष शिंदे सर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगीतले की, आजच्या धकाधकीच्या जीवनात योग्य व्यायाम व योग्य आहार अतिशय उपयोगी असून महाविद्यालयीन जीवनात खेळावर देखील लक्ष केंद्रित करण्यास सांगितले. तसेच प्रमुख पाहुणे श्री. कोळी यांना बोलण्यास अनुमोदन दिले. त्याच बरोबर प्रश्नोत्तराच्यावेळी महाविद्यालयाचे ग्रंथपाल प्रा. नारायण बारसे आपले मनोगत व्यक्त करताना म्हणाले की, जर आपण हृदयासाठी काम केले तर हृदय आपल्यासाठी काम करेल. ते पुढे म्हणाले की, प्रत्येकानी स्वतःसाठी व कुटुंबासाठी दररोज एक तास तरी व्यायाम करून आपले जीवन आरोग्यदायी व सुखी करावे असे भावनिक आवाहन केले. या कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात जिमखाना समितीचे अध्यक्ष डॉ. प्रमोद खराटे यांनी एकूणच जिमखान्याच्या कार्यपद्धतीचा आढावा घेऊन जिमखान्याचा वैभवशाली इतिहास थोडक्यात उलगडून सांगीतला.

**जोशी बेडेकर महाविद्यालयात लेखा संग्रहालयचे उद्घाटन**



जोशी बेडेकर स्वायत्त महाविद्यालयामध्ये दिनांक ३०.८.२१ रोजी सकाळी ११.०० वाजता लेखापालनाच्या उत्क्रांतीच्या संपूर्ण प्रवासाचे वर्णन करणाऱ्या लेखा संग्रहालयाचे भव्य उद्घाटन झाले. ICAI चे अध्यक्ष CA निहार. एन. जंबुसरिया WIRC चे अध्यक्ष CA मनीष गाडिया हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. CA अर्पित काबरा (सचिव), CA दृष्टी देसाई (उपाध्यक्ष), CA जयेश काला (कोषाध्यक्ष) हे उपस्थित होते.

जोशी बेडेकर महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली अकाउंटन्सी विभागातर्फे हे संग्रहालय आकाराला येत आहे. विभाग प्रमुख प्रा. योगेश प्रसादे व अकाउंटन्सी विभागातील सर्व प्राध्यापक यांच्या प्रयत्नातून हे साध्य झाले आहे.

**लोकसेवेची मुलतत्त्वे या विषयावरील एका विशेष अभ्यासक्रमाचे आयोजन**

महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना व डी एल एल ई (DLLE) विभागाने महात्मा गांधी नॅशनल कौन्सिल

ऑफ रुरल एज्युकेशन (MGNCRE), मुंबई विद्यापीठाचा DLLE विभाग, तसेच महिला परिवर्तन संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थ्यांसाठी तीन आठवड्याच्या 'लोकसेवेची मूलतत्त्वे' या विषयावरील एका विशेष अभ्यासक्रमाचे आयोजन १५ जून ते ४ जुलै २०२१ च्या कालावधीत करण्यात आले होते. मुंबई विद्यापीठाचा DLLE विभागाचे संचालक डॉ. दिलीप पाटील, महिला परिवर्तन संस्थेच्या श्रीमती वर्षा परचुरे, एम जी एन सी आर ई चे श्री चेतन चीतलकर, मुंबई विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना प्रकल्प अधिकारी श्री सुधीर पुराणिक, जोशी-बेडेकर महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना प्रकल्प अधिकारी प्रा शिवाजी नाईक व जोशी-बेडेकर महाविद्यालयाच्या डी एल एल इ विभागाच्या प्रमुख डॉ. संगीता मोहंती व उपप्राचार्या डॉ. प्रियंवदा टोकेकर उपस्थित होत्या.

**एकवीस दिवसीय ओरिएंटेशन कोर्सचे आयोजन**

विद्यापीठ अनुदान आयोग संचलित मानव संसाधन विकास केंद्र मुंबई विद्यापीठ व राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान यांच्या वतीने एकवीस दिवसीय ओरिएंटेशन कोर्सचे आयोजन दिनांक १९ जुलै ते ७ ऑगस्ट २०१९ दरम्यान करण्यात आले होते. याचे संपूर्ण संयोजन जोशी-बेडेकर स्वायत्त महाविद्यालयाच्या वतीने करण्यात आले. या कोर्सच्या उद्घाटनाला मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुहास पेडणेकर उपस्थित होते. समारोप सत्रासाठी एस एन डी टी विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. शशिकला वंजारी यांचे मार्गदर्शन मिळाले.

या कोर्ससाठी ३२ प्राध्यापक भारताच्या विविध राज्यांमधून सहभागी झाले होते. या कोर्समध्ये मॅगसेसे पुरस्कार प्राप्त डॉ. भारत वाटवानी, श्रीमती मेधा पाटकर व नीलिमा मिश्रा यांच्यासह ७० वक्त्यांचे मार्गदर्शन लाभले होते. या कोर्सच्या संयोजनाची जबाबदारी डॉ. नीलम शेख व प्रा. वेदवती परांजपे यांनी सांभाळली.

**ए क्यू ए आर (AQAR) व एस एस आर (SSR) कार्यशाळा**

स्वायत्त महाविद्यालयांनी ए क्यू ए आर (AQAR) व एस एस आर (SSR) तयार करण्या संदर्भात डीएव्ही महाविद्यालय सोलापूर येथील डॉ. दीपक ननावरे यांची चार दिवसीय कार्यशाळा दिनांक १ ते ४ सप्टेंबर दरम्यान आयोजित करण्यात आली. स्वायत्त महाविद्यालयांनी नॅक कडून मूल्यांकन करून घेण्यासाठी दस्तऐवजीकरण प्रगत पद्धतीने करण्यासाठी या कार्यशाळेचा खूप उपयोग झाला. महाविद्यालयाच्या अंतर्गत गुणवत्ता कक्षाच्या डॉ. प्रज्ञा राजे-बहादूर यांनी संयोजनाची जबाबदारी पार पाडली. या कार्यशाळेत विद्या प्रसारक मंडळ संचलित प्रगत अध्ययन केंद्राच्या डॉ. माधुरी पेजावर यांचेही मार्गदर्शन मिळाले.

## बांदोडकर विज्ञान महाविद्यालय

**Competitive Examination Guidance Session**

जैवतंत्रज्ञान व सूक्ष्मजीवशास्त्र विभागाच्या माजी विद्यार्थिनी कु. शिवानी मालवणकर यांचे "Competitive Examination Guidance Session" यावर २६ जुलै २०२१ रोजी व्याख्यान संपन्न झाले.

कु. शिवानी यांनी "AIIMS Entrance Exam for Post Graduation in Biotechnology Course" याबद्दल सखोल मार्गदर्शन केले. तसेच त्यांनी "Regulatory roles of tRNA fragments" या विषयावर त्यांच्या संशोधनाबद्दल त्यांचे अनुभव मांडले. विद्यार्थ्यांनी देखील त्यांना असलेल्या शंकांचे शिवानी यांचेकडून निरसन करून घेतले. या सत्राला ३९ विद्यार्थी उपस्थित होते.

**IPR and Patents**

जैवतंत्रज्ञानव सूक्ष्मजीवशास्त्र या विभागाच्या संयुक्त विद्यमाने डॉ. वा. ना. बेडेकर स्मृती व्याख्यानमाले अंतर्गत २९ जुलै २०२१ रोजी "IPR and Patents"

याविषयावर व्याख्यान आयोजित केले होते. डॉ. परवेझकुडोली, प्रिन्सिपल असोसिएट, खुराना अँड खुराना यांनी यावेळी मार्गदर्शन केले. त्यांच्या व्याख्यानात त्यांनी IPR चा आढावा घेतला व त्याच्या जैवशास्त्राशी निगडित कशाप्रकारे उपयोग होऊ शकेल यावर आपले विचार व्यक्त केले. त्यांनी पेटंटस्, ट्रेडमार्क व कॉपीराइट याबद्दल विविध दाखले दिले. तसेच IPR क्षेत्रातील नोकरीच्या संधीबाबत त्यांनी चर्चा केली. या वेबिनार ला १२५ विद्यार्थ्यांनी उपस्थिती नोंदवली.

**NDLI : A Knowledge Reservoir**





भारतीय ग्रंथालय शास्त्राचे जनक डॉ. शियाली रंगनाथन यांच्या जयंतीनिमित्त १२ ऑगस्ट २०२१ रोजी ग्रंथालय विभागातर्फे त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी ग्रंथपाल सौ. कादंबरी मांजरेकर यांनी डॉ. रंगनाथन यांचे ग्रंथालय क्षेत्रातील योगदान यावर भाष्य केले. तसेच ग्रंथालय विभागातर्फे "NDLI : Knowledge Reservoir" विषयावर वेबीनार संपन्न झाले. यावेळी सौ. कादंबरी मांजरेकर यांनी "National Digital Library of India" याबद्दलची सर्वांना ओळख करून दिली. NDLI चे सभासदत्व घेण्यापासून ते त्यातील ज्ञानाचे भांडार विविध पद्धतीने आपण शोधू शकतो त्या पद्धती उदाहरणादाखल त्यांनी दाखवल्या. या वेबीनारला ३९ शिक्षकांनी आपला सहभाग नोंदवला.

**Enhancement of Skills of Anatomy Diagram**

वनस्पतीशास्त्र विभागातर्फे १३ऑगस्ट २०२१ रोजी "Enhancement of Skills of Anatomy Diagram" या विषयावर कार्यशाळा संपन्न झाली. डॉ. ऊर्मिला कुमावत, सहाय्यक प्राध्यापक, वनस्पतीशास्त्र विभाग यांनी विद्यार्थ्यांना आकृत्या कशा प्रकारे काढाव्यात याबाबत प्रात्यक्षिकाद्वारे दाखवून दिले. या सत्राला तृतीय वर्ष वनस्पती शास्त्र विभागाच्या १७ विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदवला.

**राष्ट्रीय सद्भावना दिवस**



राष्ट्रीय सेवा योजना (NSS) विभागाच्यावतीने २० ऑगस्ट २०२१ रोजी राष्ट्रीय सद्भावना दिवस साजरा करण्यात आला. महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. मोजेस कोलेट यांनी सद्भावना दिवसाचे महत्त्व थोडक्यात सांगितले. त्यानंतर सदभावना दिवसाबद्दल एक व्हिडिओ दाखवण्यात आला. डॉ. उज्ज्वला गोखे, राष्ट्रीय सेवा योजना (NSS) प्रोग्राम ऑफिसर यांनी प्रमुख पाहुणे श्री. आर्चिज हेमंत जोशी, कमर्शियल हेड डायरेक्टर, डॉ. रेड्डी लॅब यांचा परिचय करून दिला. जोशी सरांनी सद्भावना या शब्दाचा अर्थ विविध दाखले देऊन उलगडून सांगितला. यशस्वी व्यक्ती होण्याआधी आपण एक चांगली व्यक्ती असणे आवश्यक आहे ही बाब त्यांनी अधोरेखित केली. या वेबिनारला ६७ विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदवला.


### Urban Beekeeping

प्राणीशास्त्र विभागाच्या "Green Force Nature Club" तर्फे १८ ऑगस्ट २०२१ रोजी "Urban Beekeeping" या विषयावर वेबिनार आयोजित करण्यात आले होते. यावेळी उपस्थित मार्गदर्शक श्री. वारे यांनी मधमाशा व त्यांचे महत्त्व याबद्दल मार्गदर्शन केले. मधमाशांचा उगम, त्यांचा इतिहास, त्यांचे जीवन-चक्र मधमाशांचे मानवाला होणारे फायदे याबद्दल अतिशय खेळीमेळीच्या वातावरणात प्रकाश टाकला. या वेबीनारला २७ विद्यार्थी व ६ शिक्षक उपस्थित होते.

### The story of a Lost Tree

वनस्पतीशास्त्र विभागाच्या सृष्टीक्लबचे उद्घाटन २१ ऑगस्ट २०२१ रोजी श्री. रुषभ चौधरी, प्रोजेक्ट फेलो, नवरोजी गोदरेज सेंटर फॉर प्लांट रिसर्च, सातारा यांच्या हस्ते संपन्न झाले. त्यांनी यावेळी "The story of a Lost Tree" या विषयावर सर्वांशी संवाद साधला. या कार्यशाळेत २१ विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदवला.

### Know Your campus flowers - an e-tour



वनस्पतीशास्त्र विभागातर्फे २३ ऑगस्ट २०२१ रोजी तृतीय वर्ष विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांकरिता आणि २६ ऑगस्ट २०२१ रोजी द्वितीय वर्ष विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांकरिता महाविद्यालयीन परिसराची e-tour आयोजित करण्यात आली होती.

लॉकडाउनच्या परिस्थितीत विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष महाविद्यालयामध्ये येणे शक्य नसल्यामुळे e-tour चे आयोजन करण्यात आले होते. यावेळी कु. ऐश्वर्या देशमुख, सहाय्यक प्राध्यापक, वनस्पतीशास्त्र विभाग यांनी "Know Your campus flowers - an e-tour" या विषयावर व्याख्यान दिले. महाविद्यालयीन परिसरातील विविध फुलझाडे, त्यांची सर्वसामान्य परिचित नावे व बोटॅनिकल नावे आणि त्यांचे उपयोग यावर मार्गदर्शन केले. यावेळी द्वितीय वर्षाच्या ३६ विद्यार्थ्यांनी, तसेच तृतीय वर्षाच्या २० विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदवला.

### Tracks and Signs in Wildlife Studies

प्राणीशास्त्र विभागातर्फे डॉ. वा. ना. बेडेकर व्याख्यानमाले अंतर्गत २८ ऑगस्ट २०२१ रोजी "Tracks and Signs in Wildlife Studies" या विषयावर श्री. सम्राट गोडांबे यांचे व्याख्यान संपन्न झाले. वन्य प्राण्यांचा अभ्यास करण्याकरता, प्राण्यांची जनगणना करण्याकरता Tracks व Signs यांचा कशाप्रकारे वापर केला जातो याबद्दल त्यांनी मार्गदर्शन केले. डॉ. सलीम अली देखील या पद्धतीचा वापर पक्ष्यांचा अभ्यास करण्याकरता करत असत, असे त्यांनी नमूद केले.

### Home Scale Production of Jam, Squash and Syrup


वनस्पतीशास्त्र विभागातर्फे "Home Scale Production of Jam, Squash and Syrup" विषयावर ३० ऑगस्ट २०२१ रोजी कार्यशाळा संपन्न झाली. विविध फळांपासून जॅम, सिरप कशा प्रकारे बनवता येईल याबाबत डॉ. उर्मिला कुमावत, सहाय्यक प्राध्यापक, वनस्पतीशास्त्र विभाग यांनी विद्यार्थ्यांना व्हिडिओच्या माध्यमातून प्रात्यक्षिक दाखविले. या कार्यशाळेला २१ विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदवला.

## विद्या प्रसारक मंडळाचे
## ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय

### सत्र – दोन अंतर्गत आणि सराव

२०२० – २०२१ प्रथम वर्ष विधीच्या विद्यार्थ्यांचे सत्र – दोन अंतर्गत आणि सराव २, २१, २८, १ सप्टेंबर रोजी नियोजित होते. वेळापत्रकानुसार ते आयोजित केले गेले आहे आणि मूल्यमापन पूर्ण होण्याच्या मार्गावर आहे.

### ३ ऑगस्ट, २०२१ बार एआयबीई मध्ये नाव नोंदणी बद्दल अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन




३ ऑगस्ट, २०२१ रोजी अधिवक्ता परिषद आणि अखिल भारतीय अधिवक्ता परिषद परीक्षा नाव नोदणीसाठी एक भव्य ऑनलाइन मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. २०२० – २०२१ च्या कार्यक्रमाला ९६ विद्यार्थी उपस्थित होते. आमचे माजी विद्यार्थी श्री. गजानन चव्हाण, सदस्य बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र आणि गोवा यांनी विद्यार्थ्यांना नाव नोंदणीसाठी अटी आणि पात्रता यावर मार्गदर्शन केले. ज्या उमेदवाराला नावनोंदणी करायची आहे आणि त्यांच्यावर फौजदारी आरोप प्रलंबित असल्यास त्यांनी पाळल्या जाणाऱ्या प्रक्रियेबाबत मार्गदर्शन केले. फॉर्मची उपलब्धता, आवश्यक कागदपत्रे इत्यादी देखील विस्तृतपणे समजावून सांगितले. ॲड. श्रीमती रीटा उत्तेकरने फॉर्म भरणे, कागदपत्रे तयार करणे, पोलिस पडताळणी आणि अखिल भारतीय अधिवक्ता परिषद परीक्षेची तयारी करणे याबद्दलचा अनुभव शेअर केला. डॉ. श्रीमती श्रीविद्या जयकुमार आणि प्रा. विनोद वाघ यांनी अखिल भारतीय अधिवक्ता परिषद परीक्षेच्या तयारीसाठी अभ्यासक्रम आणि प्रश्नपत्रिका नमुना यावर मार्गदर्शन केले.

### ठाणे लॉ कॉलेज क्लस्टरचे सत्र – दोनचे वेळापत्रक

ठाणे लॉ कॉलेज क्लस्टरचे सत्र – दोनचे वेळापत्रक २० सप्टेंबरपासून सुरू होणाऱ्या परीक्षांसाठी वेळापत्रक ७ ऑगस्ट रोजी अधिसूचित करण्यात आले.

### विप्रमंचे टि. एम. सी. विधी महाविद्यालच्या विधी सहाय्य केंद्राचा अहवाल


### वारसा पत्र यावर विशेष व्याख्यान दिनांक २१ ऑगस्ट २०२१



दिनांक २१ ऑगस्ट २०२१ रोजी महाविद्यालयाच्या विधी सहाय्यक केंद्राच्या माध्यमातून वारसा पत्र याविषयी एका विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते ठाणे जिल्हा व सत्र न्यायालयाचे अधिवक्ता श्री. सुनील परांजपे यांनी या विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले. हेर्शिप सर्टिफिकेट आणि सक्सेशन सर्टिफिकेट यांची आवश्यकता आणि प्रक्रिया काय आहे, त्याचे महत्त्व काय आहे याची सामान्य जनतेला माहिती असणे आवश्यक असल्यामुळे हा विषय विधी सहाय्यक केंद्राच्या माध्यमातून जागृतीसाठी मांडण्यात आला.

सदर कार्यक्रम हा गुगल मीट या आभासी मचांवरून घेण्यात आला होता.

**कायदा जागृती कार्यक्रम दिनांक : २८ ऑगस्ट २०२१**



विद्या प्रसारक मंडळाचे टि. एम. सी. विधी महाविद्यालय ठाणे आणि जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, ठाणे यांच्या माध्यमातनू एक दिवसीय 'कायदा जागृती अभियान' राबविण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव श्री. एम. आर. देशपांडे आणि महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. श्रीविद्या जयकुमार उपस्थित होते. श्री. देशपांडे यांनी जिल्हा विधी सेवा प्राधिकरण देत असलेली सेवा आणि ती कशाप्रकारे घेता येईल याची माहिती दिली. महाविद्यालयामध्ये चालणारे विधी जागृती संबंधीची माहिती डॉ. श्रीविद्या जयकुमार यांनी दिली. यावेळी वरिष्ठ नागरिक आणि पालक यांचा निर्वाह निधी विशेष कायदा यावर अधिवक्ता श्री. आय ए शेख यांनी मार्गदर्शन केले व वरिष्ठ नागरिक आणि पालक यांना सांभाळण्याची जबाबदारी अशा प्रकारे पाल्य आणि जवळचे नातेवाईक यांच्यावर आहे आणि ती कशाप्रकारे करून घेता येईल याची माहिती दिली. महाराष्ट्र नॅशनल लॉ युनिव्हर्सिटीचे प्राध्यापक मिलिंद गवई यांनी मूलभूत कर्तव्य आणि रोजगाराचा अधिकार यावर मार्गदर्शन केले. मूलभूत कर्तव्य कशाप्रकारे परिवर्तन घडवू शकतात याची माहिती दिली. तसेच 'रोजगाराचा अधिकार' हा कशाप्रकारे जीवन जगण्याचा भाग आहे याचीही ही सविस्तर माहिती दिली. तिसरा विषय हा अपघात विषयक कायदा आणि रहदारीचे नियम यावर आधारित होता. यासाठी ठाणे येथील ट्रान्सपोर्ट विभागाचे सहाय्यक आयुक्त श्री. भूषण राऊत यांना पाचारण करण्यात आले होते. यावेळी त्यांनी रहदारीच्या अनेक नियमांचे महत्त्व सांगून नागरिकांनी कशाप्रकारे हे नियम समजून त्याचे पालन केल्यास अपघात कमी होऊ शकतील याची माहिती दिली. यावेळी महाविद्यालयाच्या विधी सहाय्यक केंद्राचे प्रभारी प्रा. विनोद एच. वाघ, तसेच प्रा. हेतल मिशेरी यांनी देखील आपले मत मांडले. सदर कार्यक्रम हा आभासी मंच झूमवर घेण्यात आला होता. तसेच यू ट्यूब लाईव्ह देखील करण्यात आले होते.

**आंतरराष्ट्रीय युवा दिवस (१२ ऑगस्ट)**

१२ ऑगस्ट हा आंतरराष्ट्रीय युवा दिवस म्हणून साजरा केला जातो. या दिवसाच्या निमित्ताने महाविद्यालयाने वकृत्व स्पर्धेचे आयोजन केले होते. सदर कार्क्रमाच्या परीक्षक मिस. युतिका सावंत ह्या होत्या.

**विषय**

- **लोकशाही सदृढ करण्यामधील युवकांची भूमिका**

या स्पर्धेचे विजेते खालील प्रमाणे :

१. जगन्नाथ कुलकर्णी
२. विनायक शिवगण
३. आम्रपाली काकडे

सर्व सहभागी विद्यार्थ्यांना सहभाग प्रमाणपत्र देण्यात आले.

**२५ ऑगस्ट जिल्हा विधी सेवा प्राधिकरण**

२५ ऑगस्ट, २०२१ जिल्हा विधी सेवा प्राधिकरण व विधी सहाय्यता कक्ष ठाणे विधी महाविद्यालय ह्यांच्या

वतीने कायदेशीर मदत आणि खटलेमुक्त गावाचे महत्त्व याबद्दल जनजागृती करण्यासाठी एक किंवा दोन तालुके दत्तक घेण्यात विधी महाविद्यालयांची भूमिका ह्या विषयावर मार्गदर्शन करण्यात आले.

### जिल्हाधिकाऱ्यांनी जाहीर केलेली सुट्टी

आम्ही सत्र-दोन आणि सत्र-पाच साठी रेग्युलर ऑन लाईन लेक्चर आयोजित केले. दोन अधिवक्ता कार्यालयाच्या आभासी भेटीही घेण्यात आल्या.

### अद्वितीय संशोधन लेखन स्पर्धा


अद्वितीय संशोधन लेखन स्पर्धा राज्य स्तरावर आयोजित करण्यात आली. विद्यार्थ्यांना उद्देशाने घटनेत दुरुस्ती करण्याची शिफारस करणे, मूलभूत संरचनेच्या सिद्धांताशी सुसंगतता आणि संविधानात नमूद केल्यानुसार सुधारणा करण्याची प्रक्रिया. सदर स्पर्धेसाठी परीक्षक प्राचार्या डॉ. श्रीमती पूजा नारवडकर, न्यू लॉ कॉलेज, सांगली, ॲड. कैसर अन्सारी, वरिष्ठ वकील, ठाणे तसेच ॲड. प्रशांत पंचाक्षरी, वरिष्ठ वकील, ठाणे परीक्षक म्हणून काम पाहणार असून, सदर स्पर्धेचे निकाल १५ सप्टेंबर रोजी ऑनलाइन कार्यक्रमाद्वारे जाहीर करण्यात येणार आहे.

### तृतीय वर्ष विधी विद्यार्थ्यांची प्रवेश प्रक्रिया

१२ ऑगस्ट २०२१ रोजी आमच्या ३ वर्षांच्या एलएलबी विद्यार्थ्यांचे प्रवेश सुरू झाले. आजपर्यंत ३०२ विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आला आहे. त्यांचे रोल नंबर देखील अधिसूचित केले आहेत. १६० विद्यार्थ्यांची ओळखपत्रे प्राप्त झाली आहेत आणि वितरण सुरू झाले आहे.

विद्यापीठाच्या परिपत्रक दिनांक ४ ऑगस्ट, २०२१ प्रमाणे शुल्क आकारण्यात आले. साथीच्या रोगाच्या परिस्थितिमुळे महाराष्ट्र शासनाने शुल्क कमी केले. विद्यार्थ्यांनी अर्ज केल्यावर त्यांना टप्प्याटप्प्याने शुल्क भरण्याची सवलत देण्यात आली.

### वकील कार्यालयाची आभासी भेट



डॉ. श्रीविद्या जयकुमार प्रभारी प्राचार्यांनी वकिलांशी संपर्क साधून आणि अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी त्यांच्या कार्यालयाच्या आभासी / ऑनलाइन भेटींची व्यवस्था केली. सदर भेटी अतिशय माहितीपूर्ण होत्या. त्यांच्या सहकार्याबद्दल महाविद्यालय त्यांचे आभारी आहे. ऑगस्ट महिन्यात पुढील भेटी आयोजित करण्यात आल्या होत्या.

| दिनांक | वेळ | वकील |
|---|---|---|
| 17/08/2021 | 06.30pm | ॲड. श्री. राज नलगे, ठाणे |
| 20/08/2021 | 11.00am | डॉ. श्रीमती शर्मिला घुगे, दिवाण असोसिएशन, मित्तल टॉवर, मुंबई |
| 27/08/2021 | 06.30pm | श्री. केशवा पुजारी, ठाणे MACT विशेष |
| 31/08/2021 | 04.00pm | श्रीमती स्वाती सिन्हा, मुंबई |
| | 06.30pm | कॉर्पोरेट वकील श्री. यतीन पंडित, ठाणे |

आयुष्यात काही चांगलं करायचं तर त्याची सुरुवात आजपासूनच करा!



महाविद्यालयाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षात आमचे माजी विद्यार्थी ॲड. गजानन चव्हाण अधिवक्ता परिषद, ठाण्यामधील सिंह, एक चांगला शोमरोनी, एक परोपकारी असे महाराष्ट्र आणि गोवाच्या सन्मानित अधिवक्ता परिषदेचे अध्यक्ष म्हणून निवड झाली. व्हीपीएम महाविद्यालयाच्या संपूर्ण मंडळाकडून अभिनंदन आणि शुभेच्छा!



**सन्माननीय न्यायाधीश श्री. अभय ओक (सर्वोच्च न्यायालय) आमचे माजी व्हिजिटिंग फॅकल्टी**

## विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतन

### Curriculum Development of MSBTE Short Term Programmes (Non – AICTE)

सर्व उद्योगासाठी तांत्रिक स्वरूपाची कौशल्ये संपादित करायची असतील तर या गुंतागुंतीच्या उद्योगासाठी कृतीशील कार्ये वेगाने करण्याची आवश्यकता आहे. शिवाय ज्ञानाच्या प्रांतात यशस्वी व्हायचे असेल तर तांत्रिक आणि कार्यात्मक कौशल्ये निपुण असणे फार गरजेचे आवश्यक आहे.

परिणामकारक अध्ययन हे नेहमी आपल्या हाती असलेल्या अनुभवांतून व प्रकल्पांतून येते. सदरचा अभ्यासक्रम हा उद्योजकासाठी चांगले मनुष्यबळ प्राप्त करण्यासाठी फार उपयुक्त आहे. शिवाय कामगारांनाही मूलभूत माहिती प्राप्त होऊन चांगले व अधिक कार्य होण्यास मदत होते. शिवाय कामगारांचाही आत्मविश्वास वाढतो आणि उद्योजकानाही तांत्रिक कौशल्यपूर्ण मनुष्यबळ प्राप्त होते.

याच सद्यस्थितीचा अभ्यास करून महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाने (Non - AICTE) औद्योगिक आणि समाजाच्या गरजा लक्षात घेऊन त्याची पूर्तता करण्यासाठी काही अल्प मुदतीचे पदविका कोर्सेस कौशल्य (SKP - Skill Knowledge Provider) आधारित विकसित केलेले आहेत. सदर पदविका अभ्यासक्रम हा सद्यस्थितीतील बाजारातील मागणीच्या आधारे केलेले आहेत.

सदरचा पदविका अभ्यासक्रम राबविण्याची जबाबदारी विद्या प्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेतनला देण्यात आली आहे. जवळ-जवळ तीन ऑन-लाईन कार्यशाळा त्याविषयी घेण्यात आल्या असून अनुभवी शिक्षकांद्वारे आणि औद्योगिक तज्ज्ञांद्वारे अभ्यासक्रम निश्चित करण्यात आला आहे.

**अभ्यासक्रमाची मुख्य वैशिट्ये**

१. सर्व अभ्यासक्रम हे एक वर्ष कालावधीचे आहेत (एकूण ०२ सत्रे)

२. प्रथम सत्र हे वर्गात शिकविण्यात येईल

३. प्रत्येक सत्रात ३० तास संपर्क सत्रे असतील

**पात्रता**

सर्व अभ्यासक्रमासाठी महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळाची बारावी पास

- ITI
- MCVC

**अभ्यासक्रमाची यादी तज्ज्ञासह**

| Sr. No. | Name of the Programme | Programme Conductor | Programme Expert | Name of the Industry expert / Subject Expert |
|---|---|---|---|---|
| 1 | Diploma in Sound Recording and Video editing | Mr. Thushar V. Mohite – Patil HOD | Mr. Sunil Padmakar Nagare Lecturer | ----- |
| 2 | Diploma in Photography & Videography | Mr. Thushar V. Mohite – Patil HOD | Mrs Amisha D. Bhoir Lecturer | Mr. Manoj Musale Professional Photographer |
| 3 | Diploma in Fitness Training | Mrs. Suhasini Shula HOD | Mrs. Sujata Gawade Lecturer | Mr. Ganesh Ramchandra Parkar, Professional Fitness Trainer , Bombay Fitness Center |
| 4 | Diploma in Electrical & Electronics Equipment maintenance & Repair | Mrs. Rajashree U. Patil Sr. Lecturer | Mrs. Pooja K. Pawar Lecturer | Mr. Salil Nerurkar Head, Business Develoment and Exports, Marathon Electric Motors India Pvt. Ltd. |
| 5 | Dipolma In Health & Welibeing | Dr. Usha Raghavan HOD | Mrs. Archana Kalia Lecturer | Mrs. Neelima Shastri, Faculty, Joshi – Bedekar College |
| 6 | Diploma in Fisheries | Mrs. Smita D. Khandagale Lecturer | Mrs. Rutuja O. Kambli Lecturer | Hrishikesh R. Bhatkar Sr. Research Fellow |
| 7 | Diploma in Cabin Crew and Air Hostess | Mrs. Rutuja Gajanan Tendulkar Lecturer | Mrs. Gauri Bobade Lecturer | Mrs. Sarita Ambre Cabin Crew – Air Hostess |

**विद्या प्रसारक मंडळाचे, तंत्रनिकेतनमधील श्री. संतोष शेलार सेवानिवृत्त**



विद्या प्रसारक मंडळाचे, तंत्रनिकेतनमधील श्री. संतोष शेलार हे आपल्या प्रदीर्घ सेवेनंतर दि. ३० जुन २०२१ रोजी प्रयोगशाळा सहाय्यक पदावरून सेवानिवृत्त झाले. श्री. शेलार हे सन १९८९ रोजी तंत्रनिकेतनमध्ये रुजू झाले होते. ते प्रथम रसायनशास्त्र प्रयोगशाळेत कामाला होते. त्यानंतर त्यांनी वेगवेगळ्या विभागांत काम केले. शेवटी ते आपल्या ३२ वर्षांच्या सेवेनंतर ३० जून २०२१ रोजी सेवानिवृत्त झाले.

ते अ-शासकीय महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचारी संघाच्या विद्या प्रसारक मंडळाचे, तंत्रनिकेतन ठाणे युनिटचे युनिट प्रमुख म्हणून काम करीत होते. त्यांच्या सेवानिवृत्तीनिमित्त अ-शासकीय महाविद्यालयीन

शिक्षकेतर कर्मचारी संघाच्या विद्या प्रसारक मंडळाचे, तंत्रनिकेतन ठाणे युनिटच्या कर्मचाऱ्यांतर्फे शाल, श्रीफळ आणि भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला. सत्कार समारंभ प्रसंगी अनेक सदस्यांनी श्री. शेलार यांचे विषयी आपआपली मनोगते व्यक्त केली व त्यांना पुढील भावी आयुष्य हे समृद्धीचे, आरोग्यपूर्ण भरभराटीचे जावो अशा सदिच्छा व्यक्त केल्या.

**विद्या प्रसारक मंडळाचे, तंत्रनिकेतनमधील श्री. रामबीर पाथरे सेवानिवृत्त**



विद्या प्रसारक मंडळाचे, तंत्रनिकेतनमधील श्री. रामबीर पाथरे हे आपल्या प्रदीर्घ सेवेनंतर दि. ३१ मे २०२१ रोजी सुरक्षा रक्षक पदावरून सेवानिवृत्त झाले. श्री.पाथरे प्रथम तंत्रनिकेतनमध्ये सफाई कामगार म्हणून रुजू झाले. त्यानंतर ते तंत्रनिकेतनच्या गेटवर सुरक्षा रक्षक म्हणून काम करीत होते. जवळ-जवळ ३५ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेनंतर ते ३१ मे २०२१ रोजी सेवानिवृत्त झाले.

श्री. पाथरे हे अ-शासकीय महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचारी संघाच्या विद्या प्रसारक मंडळाचे, तंत्रनिकेतन ठाणे युनिटचे सदस्य होते. त्यांच्या सेवानिवृत्ती निमित्त अ-शासकीय महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचारी संघाच्या विद्या प्रसारक मंडळाचे, तंत्रनिकेतन ठाणे युनिटच्या कर्मचाऱ्यांतर्फे शाल, श्रीफळ आणि भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला. सत्कार समारंभ प्रसंगी अनेक सदस्यांनी त्यांच्या विषयी भावना व्यक्त केल्या. व त्यांना पुढील भावी आयुष्य हे समृद्धीचे, आरोग्यपूर्ण भरभराटीचे जावो अशा सदिच्छा व्यक्त केल्या. श्री. पाथरे यांचा सत्कार दि. ३० जून २०२१ रोजी श्री. संतोष शेलार यांचे सत्कार समारंभ प्रसंगी करण्यात आला.

• दि. २० ऑगस्ट २०२१ हा दिवस सद्भावना दिवस व दि. २० ऑगस्ट २०२१ ते ५ सप्टेंबर २०२१ हा पंधरवडा सामाजिक ऐक्य पंधरवडा म्हणून साजरा करण्यासाठी विद्या प्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेतनात इन्फोरमेशन टेक्नॉलॉजी विभागाने ४ सप्टेंबर २०२१ रोजी "Gender Equality and Women Empowerment" या विषयावर वादविवाद कार्यक्रम आयोजित केला. विभागप्रमुख डॉ. उषा राघवन यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. इन्स्ट्रुमेन्टेशन विभागाने हा पंधरवडा निबंध, पोर्स्टस, ब्रीदवाक्याच्या विविध कार्यक्रमांच्या साजरीकरणाने आयोजित केला. या कार्यक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये शांती, आनंदमय वातावरण, सहिष्णूता व सामाजिक ऐक्य समजणे व वास्तवात आणण्यासाठी लागणारे प्रयत्न हा होता.

• 'स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सव' आजादीका अमृत महोत्सव (AKAM)"Technology Information, Forecasting and assessment council (TIFAC), Technology think tank of the department of Science and Technology, Govt. of India" यांनी निबंध स्पर्धा "Future Technology Needs for India-2047" या विषयावर आयोजित केली. वरील स्पर्धेला विद्यार्थ्यांचा चांगला प्रतिसाद मिळाला. वरील स्पर्धेचा निकाल १५ सप्टेंबरला तंत्रनिकेतनाच्या स्तरावर लावला जाणार आहे.

• **डॉ. सौ. गीताली इंगवले (Humanities and Applied Science) विभाग यांनी –**

१) "Inculcating Universal Human Values in Technical Education" हा ५ दिवसीय FDP कार्यक्रम '२ ऑगस्ट २०२१ ते ६ ऑगस्ट २०२१' ऑनलाईन प्रक्रियेने पूर्ण केला. सदर FDP AICTE ने आयोजित केला होता.

२) MOE's Innovation Cell, Ministry of Education

Government of India व Institution's Innovation Council यांच्या संयुक्तविद्यमाने आयोजित केलेल्या "Advanced Level" ची Innovation Ambassador Training त्यांनी ३० जुलै ते ३१ ऑगस्टमध्ये पूर्ण केली.

३) Ministy of Education, Guru Angad Dev Teaching learning Centre (PMMMNMIT) व के. जे. सोमय्या कॉलेज ऑफ सायन्स व कॉर्मस यांनी आयोजित केलेल्या FDP (Faculty Development Program) २८ जुलै ते ३ ऑगस्ट २०२१ त्यांनी उपस्थिती दर्शविली "Outcome based Education and Technology in Higher Education" या विषयावर संबंधित कार्यक्रम होता. सदर FDP मध्ये त्यांना 'अ' श्रेणी प्रदान केली.

४) "An Interdisciplinary Approach of Analytical Chemistry & Environmental Chemistry for future generation" या विषयावर देवगिरी कॉलेज (औरंगाबाद) आयोजित केलेल्या International Webinar २८ ऑगस्टला २०२१ ऑनलाईन प्लॅटफॉर्मवर आयोजित केला. त्यात त्यांनी उपस्थिती दर्शवली.

**इन्स्ट्रुमेन्टेशन विभाग**

**१) सौ. वैशाली जोशी (विभाग प्रमुख)**

अ) दिनांक १९/७/२०२१ ते २३/०७/२०२१ या ५ दिवसीय FDP कार्यक्रम SGGS इन्स्टिटय़ूट ऑफ इंजिनिअरिंग व टेक्नॉलॉजीने आयोजित केलेल्या "Enabling Entrepreneuship and Start up Mind set" या कार्यक्रमाला उपस्थिती दर्शवली.

ब) दिनांक ३०/०९/२०२१ ते ३०/०७/२०२१ या एक महिन्याच्या Innovation Ambassador च्या Foundation level ला Ministry of Education ने आयोजित केलेल्या कार्यक्रमाला उपस्थित होते.

**२) सौ. स्मिता खंडागळे**

अ) दिनांक ३०/०६/२०२१ ते ३०/०७/२०२१ या १ महिन्याच्या MOE's Innovation Cell व AICTE ने आयोजित केलेल्या Innovation Training (Foundation level) च्या कार्यशाळेला उपस्थित होत्या.

ब) दिनांक १३/०७/२०२१ ते १७/०७/२०२१ या ५ दिवसीय "Robotics and Process Automation" या FDP कार्यक्रमाला सहभाग दर्शविला. सदर कार्यक्रम नानासाहेब महाडिक कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगने आयोजित केला होता.

**३) सौ. पूजा जांभळे**

अ) दिनांक ०५/०७/२०२१ ते ०९/०७/२०२१ या ५ दिवसीय "Medical Image Processing and 3D application" या FDP ला उपस्थित होत्या. सदर कार्यक्रम University College of Engineering ने आयोजित केला.

ब) दिनांक १९/०७/२०२१ ते २३/०७/२०२१ या ५ दिवसीय FDP कार्यक्रमाला "Bio Medical Signal Processing for Smarter Medical Healthcare" या GIET University, Odisha ने आयोजित केलेल्या कार्यक्रमाला उपस्थित होत्या.

## डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था, ठाणे

**ऑगस्ट २०२१ मधील कार्यक्रम / वार्ता**

२ ऑगस्ट : प्रा. महेश भानुशाली यांनी एमएमएस वित्त शाखेचे २०१९-२१ तुकडीचे विद्यार्थी हर्षद आगवणे, तेजश्री वसल आणि सायली करंबेळकर यांना सुप्रसिद्ध विश्लेषण संस्था-इनसिंक ॲनालिटिक्स मध्ये ३ लाखाच्या वार्षिक वेतनाची रोजगार संधी मिळवून दिली.

२ ऑगस्ट : सस्मिरा इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट तर्फे

आयोजित आंतर महाविद्यालयीन व्हर्च्युअल केस स्टडी स्पर्धेचे परीक्षक म्हणून प्रा. कांचन यांना आमंत्रित करण्यात आले.

६ आणि ७ ऑगस्ट : विद्यार्थी सहभाग आणि क्रीडा समितीने एन्थुझिया २.० हा राष्ट्रीय स्तरीय आंतरमहाविद्यालयीन व्यवस्थापन उत्सव आयोजित केला. या मध्ये १२ स्पर्धा कार्यक्रम घेण्यात आले व विविध संस्थांमधून १३५ विद्यार्थी सहभागी झाले.







१३ ऑगस्ट : डॉ पल्लवी चंदवासकर आणि डॉ. मीनाक्षी मल्होत्रा यांनी उदयपूरच्या मोहनलाल सुखडिया विद्यापीठाच्या, व्यवस्थापन अभ्यास शाखेद्वारा आयोजित व्यवस्थापन पद्धतीचे मानकीकरण : आव्हाने आणि संधी (ICSMP-२०२१) या विषयावरील आंतरराष्ट्रीय परिषदेत, मॉडेरेटिंग इफेक्ट ऑफ जेंडर रिलेशनशिप बिटवीन ब्रँड पर्सनॅलिटी आणि ब्रँड लॉयल्टी - एव्हिडन्स फ्रॉम इंडियन एफएमसीजी ब्रँड या शीर्षकाचा शोधनिबंध सादर केला.


FACULTY OF MANAGEMENT STUDIES
MOHANLAL SUKHADIA UNIVERSITY, UDAIPUR (RAJ.)
INTERNATIONAL CONFERENCE
ON
STANDARDIZING MANAGEMENT PRACTICES: CHALLENGES AND OPPORTUNITIES
12th – 14th August, 2021
CERTIFICATE
This is to certify that Dr. PALLAVI CHANDWASKAR (Assistant Professor) from Dr. V.N. BEDEKAR INSTITUTE OF MANAGEMENT STUDIES has presented research paper entitled Moderating effect of gender on relationship between brand personality and brand loyalty-Evidence from Indian FMCG brand (Online Presentation) in the International Conference in Track II (Marketing).
Prof. Hanuman Prasad, Conference Chair | Prof. Meera Mathur, Organizing Secretary | Prof. Kartik Dave, Session Chair


FACULTY OF MANAGEMENT STUDIES
MOHANLAL SUKHADIA UNIVERSITY, UDAIPUR (RAJ.)
INTERNATIONAL CONFERENCE
ON
STANDARDIZING MANAGEMENT PRACTICES: CHALLENGES AND OPPORTUNITIES
12th – 14th August, 2021
CERTIFICATE
This is to certify that Dr. MEENKASHI MALHOTRA (Assistant Professor) from Dr. V.N. BEDEKAR INSTITUTE OF MANAGEMENT STUDIES has presented research paper entitled Moderating effect of gender on relationship between brand personality and brand loyalty-Evidence from Indian FMCG brand (Online Presentation) in the International Conference in Track II (Marketing).
Prof. Hanuman Prasad, Conference Chair | Prof. Meera Mathur, Organizing Secretary | Prof. Kartik Dave, Session Chair

१७ ऑगस्ट : डॉ. व्ही. एन. ब्रिम्सला मुंबई विद्यापीठाकडून पीएच.डी. पदवी केंद्राची मान्यता मिळाली असल्याने पीएचडी उमेदवारांसाठी मुलाखती आयोजित करण्यात आल्या आणि मुलाखतीसाठी आलेल्या १७ उमेदवारांपैकी ५ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली.

१९ ऑगस्ट : डॉ. पंकज नंदूरकर आणि प्रा. विभूती सावे यांनी डॉ. नीतिन जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली ब्रिमच्या सर्व प्राध्यापक सदस्यांसाठी, 'परिणाम आधारित शिक्षण' या विषयावर एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन

केले. या कार्यशाळेला सूर्य दत्ता ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्चे संघ संचालक डॉ. शैलेश कासंडे यांनी मार्गदर्शन केले.



२० ऑगस्ट : डॉ. नीतिन जोशी आणि डॉ. स्मिता जपे यांनी स्टेट बँक ऑफ इंडियाच्या प्रादेशिक कार्यालयाला भेट दिली. स्टेट बँक ऑफ इंडियाचे प्रादेशिक व्यवस्थापक श्री. प्रदीप्ता आणि महाव्यवस्थापक श्री. बक्षी यांनी डॉ. नीतिन जोशी आणि डॉ. स्मिता जपे यांना स्मृतीचिन्ह भेट दिले.



२३ ऑगस्ट : डॉ. पल्लवी चंदवासकर यांच्या मार्गदर्शनाखाली आय क्यू ए सी विद्यार्थी प्रतिनिधी, शिवानी बोस आणि विमलकुमार मिश्रा यांनी आय क्यू ए सी स्थापना दिनानिमित्त 'क्वालिटी इनेबलर्स ॲट ब्रिम्स' या विषयावरील ऑनलाईन प्रश्नमंजुषेचे आयोजन करण्यात आले.

१०५ विद्यार्थ्यांनी यात सहभाग घेतला आणि खालील अव्वल २० विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देण्यात आले.




- रोहन गिरी
- अनिकेत मिश्रा
- परेश भोपी
- रुतुजा पवार
- पल्लवी घिल्डियाल
- रुतुजा देशमुख
- शहेजाज आलम
- आयुष हरिया
- प्रियांका देवराम
- गौरी कदम
- अभिषेक घोलप
- दिपेश मिश्रा
- सुजित कोरेगावे
- निखिल आडकर
- ऐश्वर्या पावसकर
- संकेत गवस
- अंजली गावडे
- पवन परिहार
- निधी पवार
- शिवानी परांजपे

२३ ऑगस्ट : डॉ. व्ही. एन. ब्रिम्स ने ए आय सी टी इ द्वारे नियुक्त एन. बी. ए. मार्गदर्शक डॉ. सचिन वेर्णेकर यांच्या सोबत ऑनलाइन बैठक घेऊन एन. बी. ए. मार्गदर्शन प्रक्रिया सुरू केली.

२४ ऑगस्ट : प्रा. कृणाल के. पुंजानी आणि डॉ. पंकज नंदूरकर यांनी स्टार्ट-अप 'बोट्री'चे संस्थापक, TEDx पुणे आणि सीआयआय यंग इंडियन्स पुणे-युवा चेअरचे प्रमुख श्री. भरत ओसवाल यांचे 'अ टॉक विथ स्टार्ट-अप फाऊंडर' या विषयावर वेबिनार आयोजित केले.

२४ ऑगस्ट : डॉ नीतिन जोशी संयुक्तपणे एचपीई कन्सल्टन्सीसाठी गेट सेल गोल्स हा उपक्रम आयोजित केला.

२५ ऑगस्ट : रोजगार नियुक्ती विभागातर्फे २०२०-२१ च्या तुकडीतील आकाश बारस्कर व सागर निकम यांना 'एसपी वेल्थ ॲडव्हायझर्स' मध्ये, तर जिनल पांचाल हिला अकुरा सोल्युशन्स मध्ये रोजगार संधी मिळवून देण्यात आल्या.

डॉ. नीतिन जोशी, डॉ. स्मिता जपे, डॉ. पल्लवी चंदवासकर, डॉ. मीनाक्षी मल्होत्रा आणि श्री. वैभव पंडित यांची व्यावसायिक उत्कृष्टतेसाठी निर्धारक म्हणून नेमणूक झाली आणि त्यांनी सार्वजनिक क्षेत्रातील मोठ्या कंपन्यांचे मूल्यांकन सुरू केले.




डॉ. स्मिता जपे, डॉ. मीनाक्षी मल्होत्रा, प्रा. कृणाल पुंजानी आणि प्रा. संदीप मोघे यांनी एम ओ इ च्या इनोव्हेशन सेल आणि ए आय सी टी इ द्वारे आयोजित इनोव्हेशन ॲम्बेसेडर (प्राथमिक) प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण केले.












•••

(पृष्ठ क्र.२ वरून - **संपादकीय**)

आपल्या ९० वर्षांच्या कालावधीत गोविंद स्वरूप यांनी अनेक महत्त्वाची कामे केली. सिडनी जवळील पॉट्स हिल येथे ६ फूट व्यासाच्या ३२ अन्वस्त (parabolic) अँटेना उभारण्यात त्यांनी महत्त्वाची कामगिरी बजावली. उटी येथील रेडिओ दुर्बीणीच्या निर्मितीत त्यांचा सिंहाचा वाटा होता. या सगळ्या कामांत उठून दिसते हे त्यांचे महाकाय रेडिओ तरंग दुर्बीणीच्या निर्मितीतील योगदान. या दुर्बीणीची निर्मिती करून त्यांनी देशाची मान उंचावली आहे. त्यांच्या प्रथम स्मृतिदिनानिमित्त विद्या प्रसारक मंडळ त्यांना अभिवादन करीत आहे. विद्या प्रसारक मंडळाच्या वतीने चालविण्यात येणाऱ्या शिक्षण संस्थेतील विद्यार्थी आणि शिक्षक यांना जीएमआरटीची माहिती व्हावी या उद्देशाने शैक्षणिक सहलीचे आयोजन करण्याची गरज आहे. दरवर्षी विज्ञान दिनानिमित्त जीएमआरटी परिसरात विज्ञान मेळावा आयोजित करण्यात येतो. या विज्ञान मेळाव्यात बांदोडकर विज्ञान महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना सहभागी होण्यासाठी प्रोत्साहन दिले जाते. या संधीचा फायदा घेऊन तीन वर्षांपूर्वी या महाविद्यालयातील काही विद्यार्थी आपला प्रकल्प घेऊन गेले होते. त्यांचा या मेळाव्यातील अनुभव फारच उत्साहवर्धक आहे. कोविड महामारीमुळे यात खंड पडला आहे. परिस्थिती सुधारताच या भेटी पुन्हा सुरू करण्याचा विचार आहे.

**– डॉ. सुधाकर आगरकर**

•••

**ग्रंथ परिचय**

**गुरुदेव रानडे प्रणीत**

## ध्यानोपकारिणी गीता

**(ध्यानास उपयुक्त अशा सार्थ व विवरणासह)**

'गीतेच्या अभ्यासाने चित्त शुद्ध होते, आत्मा पवित्र होतो' असे गुरुदेव रानडे यांनी म्हटले आहे. योगी अरविंदांनी म्हटले आहे की, 'आम्ही जिवंत आहो तोवर ब्रह्माच्या ठिकाणी जाणीवपुरस्सर राहून व तेथील शांती उपभोगून देखील प्रकृतीच्या प्रांतात समर्थपणे कार्य करीत राहावे आणि ईश्वराशी साधर्म्य प्राप्त करून घ्यावे'.

अजूनही गीतेचा आध्यात्मिक उपयोग आहे. विचारपध्दती निर्दोष व शब्दरचना अर्थपूर्ण आहे. गीतेतला नवीनपणा, ताजेपणा अजून तसाच आहे व पुढेही राहील.

गुरुदेव रानडे यांनी गीतेची पुनर्रचना करून ३६५ श्लोक निवडून बारा अध्यायात मांडणी करून, चिंतनास उपयुक्त असे अर्थवाही मथळे निरनिराळ्या श्लोकसमूहांना देऊन, ध्यानासाठी व नित्य पठणासाठी उपयुक्त अशी 'ध्यानोपकारिणी गीता' तयार केली. तिच्यात सबाह्याभ्यांतरी साक्षात्कार आहे, असे अनुभवी साधकांचे मत आहे. या ग्रंथात ध्यानोपकारिणी गीतेच्या बारा अध्यायांचा विभागवार क्रमशः विचार केला आहे. गुरुदेवांच्या भगवद्गीता – साक्षात्काराचे तत्त्वज्ञान या ग्रंथातील श्लोकांवरील विवरण (ध्यानोपकारिणी गीतेसाठी निवडलेल्या) व त्यांच्या साधकाबरोबर झालेल्या बैठकांतील काही विशेष मुद्यांचे विवेचन व संकलकाचा अभ्यास या सर्वांचा उपयोग करून या ग्रंथात विवरण, श्लोकांच्या अर्थासह दिले आहे. संस्कृतचा फारसा परिचय नसलेल्यांना उपयुक्त असे विनोबांच्या गीताई मधील निवडक श्लोक त्याच क्रमाने, गुरुदेवांच्या मथळ्यांसह दिले आहेत, ते मूळ गीतेच्याच वृत्तात असल्याने त्याच पद्धतीने वाचायला, पठणाला मदत होते, अर्थ मनात ठसतो.

**– डॉ. हेमचंद्र दयार्णव कोपर्डेकर**

बी २।२० सरिता वैभव, सिंहगड रस्ता, पुणे

Email : hdkopardekargmail.com

Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006

# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

- अत्याधुनिक दृक् श्राव्य यंत्रणा
- वातानुकूलित प्रसन्न वातावरण
- वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा

अशा सुविधांनी युक्त

| सभागृहाचे नाव | ठिकाण | आसन क्षमता |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत | १६० |
| पातंजली सभागृह | बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि. प्र. मं. चे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

**❉ संपर्क ❉**

कार्यवाह

## विद्या प्रसारक मंडळ

विष्णूनगर, नौपाडा, ठाणे – ४०० ६०२

दूरध्वनी क्रमांक – २५४२६२७०

हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे – ४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे–४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे – ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.